लग्न बस्त्याची खास सोय
प्रोप्रा. आर. एन. शिंगवी
महावीर क्लॉथ स्टोअर्स
रेडीमेड | होजिअरी | सुटींग | शर्टींग | साड्या
कोल्हार बु।, ता. राहाता, जि. अ.नगर.
M. 9860329429, 9822595353

दैनिक
जनता आवाज

मौल्यवान नात्यांसाठी मौल्यवान दागिने
विश्वासाची परंपरा जपणारे
देडगांवकर सराफ
झेड.के.मार्केट, नागेबाबा बँकेजवळ, कोल्हार बु।।
दीपक ९८९०३९९१९९ | रोहित ९७६६७८७२७४

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक ११ वा | रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

आजचे हवामान
कमाल 32°C | किमान 16°C

पेट्रोल 103.50 | डिझेल 90.03

सोने 1,56,200 | चांदी 2,44,999

संमिश्र

विलिनीकरणाचा विषय आमच्यापुढे नाही : भुजबळ

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी शनिवारी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाचा विषय आमच्यापुढे नसल्याच स्पष्ट केले आहे. रोज विलीनीकरण ही काय चर्चा आहे का? ही चर्चा आज, उद्या, महिना किंवा २ महिन्यांनीही करता येईल. या प्रकरणी घाई करण्याची काहीच गरज नाही, असे ते म्हणालेत. अजितदादांच्या निधनानंतर महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले आहे. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने आमची अजित पवारांशी विलीनीकरणाच्या मुद्यावर चर्चा सुरू होती व १२ फेब्रुवारी रोजी विलीनीकरणाची अधिकृत घोषणा होणार होती असा दावा केला आहे. पण अजित पवारांच्या पक्षाने हा दावा फेटाळून लावला आहे.

मोदी हवाई दलाच्या विमानातून महामार्गावर

गुवाहाटी : पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी आसाममध्ये पोहोचले. त्यांच्या भेटीदरम्यान त्यांनी गुवाहाटी येथे सांगितले की, काँग्रेसने देशाला धोक्यात आणले. जेव्हा जेव्हा काँग्रेसने सैन्यासाठी शस्त्रे खरेदी केली तेव्हा त्याचा अर्थ हजारो कोटींचा घोटाळा झाला. ते म्हणाले, पंतप्रधान प्रथम चाबुआ एअरफील्डवर पोहोचले. त्यानंतर ते हवाई दलाच्या सी-१३० विमानाने दिब्रुगडला गेले. विमान मोरन बायपासवरील आपत्कालीन लँडिंग सुविधा (ईएलएफ) येथे उतरले आणि असे करणारे ते पहिले पंतप्रधान बनले.

'ट्रम्प यांनी मोदींचे माकड केले'

मुंबई : अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे माकड केल्याची अत्यंत जहरी टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या हाती पंतप्रधान मोदींची एखादी दुखरी नस लागली आहे. त्यामुळेच ते त्यांना आपल्या तालावर नाचवत आहेत, असे ते म्हणालेत. मोदी सरकारने अमेरिकेशी एक व्यापार करार केला आहे. विरोधकांनी या करारावर टीका करत या करारामुळे सरकारने भारतीय शेतकऱ्यांचे भवितव्य अमेरिकेच्या भरवशावर सोडल्याचा आरोप केला आहे.

आता दप्तराची चिंता मिटली?

◆ १ ली ते ८ वी मोफत दप्तर योजना ◆ राज्य सरकारकडून दप्तरासाठी १६५ कोटी

जनता आवाज वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठी आनंदवार्ता समोर आली आहे. राज्य सरकारने मोफत दप्तर देण्याच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिली असून यासाठी १६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायदा २००९ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी अधिक अनुकूल आणि आनंददायी शैक्षणिक वातावरण तयार करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षापासून मोफत दप्तर देण्यात येणार आहे. एकूण ४१ लाख ४३ हजार ५४ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता.

शिक्षण संचालकांनी सादर केलेल्या या प्रस्तावानुसार निधीची मागणी करण्यात आली आणि त्यानुसार १६५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

(पान ४ वर)

शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठीही प्रयत्न

मोफत दप्तर योजनेमुळे शाळांकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढेल का, हा प्रश्नही उपस्थित होत आहे. सुविधा वाढवणे ही महत्त्वाची बाब असली तरी शिक्षणाचा दर्जा, अध्यापनाची गुणवत्ता आणि शाळांवरील विश्वास टिकवणे तितकेच गरजेचे आहे. त्यामुळे या नव्या निर्णयासोबतच शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठीही प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. एकूणच, १६५ कोटींच्या तरतुदीसह जाहीर झालेली मोफत दप्तर योजना ही विद्यार्थ्यांसाठी दिलासा देणारी ठरली असली तरी तिची प्रभावी अंमलबजावणी आणि शैक्षणिक दर्जा उंचावणे हे पुढील मोठे आव्हान असणार आहे.

टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे योद्धे

हर्षवर्धन सपकाळांचे वादग्रस्त विधान; शिवप्रेमींमध्ये संताप!

जनता आवाज वृत्तसेवा

बुलढाणा : स्वराज्य रक्षक छत्रपती शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्य असा विचार दिला, अगदी त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनी त्याच समकक्ष काम केले आहे. त्यामुळे टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे, असे वादग्रस्त विधान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले.



सपकाळ हे बुलढाण्यात बोलत असतांना वादग्रस्त विधान करत महाराष्ट्रात नव्या वादाला तोंड फोडले आहे.

सपकाळ म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचं शौर्य ज्याप्रकारचे आहे, त्यांनी जो स्वराज्या विचार दिला, त्याच मांदियाळीत, त्यांच्यानंतर बऱ्याच वर्षांनी टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्याविरोधात लढा पुकारला होता. त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे योद्धे होऊन गेले, भारताचे भूमिपूत्र होऊन गेले, त्यांनी कधीही कोणत्याही विषारी, विखारी विचारांना जवळ केले नाही. त्यामुळे शौर्याचे लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांच्याकडे शिवाजी महाराजांच्या समकक्ष पाहिले पाहिजे, असे सपकाळ यांनी म्हटले आहे.

दरम्यान, यावेळी बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी राजकारणावरही भाष्य केले आहे. ते म्हणाले, नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयात ५० हजारांची (पान ४ वर)

वादग्रस्त विधानाने वाद पेटणार?

मालेगावात महानगरपालिकेतील उपमहापौरांच्या दालनातील टिपू सुलतानच्या फोटोवरून वाद निर्माण झालेला असतानाच, त्यात हर्षवर्धन सपकाळ यांच्या वादग्रस्त विधानाने आणखी वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सपकाळ यांना लाज वाटली पाहिजे

काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांवर देवेंद्र फडणवीसांचा घणाघात

जनता आवाज वृत्तसेवा

नागपूर : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानसारख्या नराधमाची तुलना छत्रपती शिवरायांशी केली ते अतिशय निंदनीय आहे. सपकाळ यांना लाज वाटली पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवरायांनी स्वराज्य तयार केले. मुघलांच्या जोखडातून सामान्य जनतेला मुक्त करण्याचे काम केले. खऱ्या अर्थाने सामान्य रयतेचे राज्य तयार करणारे छत्रपती शिवराय होते. आणि त्याच वेळी हजारो लाखो हिंदूंची हत्या करणे टिपू सुलतान. या दोघांची तुलना करून दोघांना सारखे सन्मान द्या म्हणणे यापेक्षा जास्त लांगूलचालन, जोडे चाटणे मी या जन्मान बघितले नाही.

आम्ही हे बिलकुल सहन करणार नाही. टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवरायांशी केळकी त्याबद्दल त्यांनी माफी मागितली पाहिजे, अशी मागणी फडणवीस यांनी केली आहे. तसेच अशा पद्धतीने ते बोलत असतील आणि काँग्रेस पक्षाने जरा जरी थोडी जरी नैतिकता राहिली असेल तर त्यांनी त्यांची भूमिका मांडली पाहिजे.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुलुंड अपघातावर प्रतिक्रिया दिली, ते म्हणाले की, मुलुंडमध्ये जो अपघात झाला हा अत्यंत (पान ४ वर)

कोल्हार येथे शेततळ्यात पडून तरुणाचा मृत्यू

जनता आवाज वृत्तसेवा

कोल्हार : राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द येथे कहार वस्ती लगत असलेल्या शेततळ्यात पडून एका इसमाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोल्हार खुर्द येथील रहिवासी लक्ष्मण सूर्यवंशी (वय ४०) हे शुक्रवारी आठवडे बाजाराच्या दिवशी घरापासून काही अंतरावर असलेल्या शेततळ्याकडे गेले होते. त्यानंतर ते शेततळ्यात पडल्याची घटना घडली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र ही बाब काल, दुसऱ्या दिवशी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास निदर्शनास आली. घटनेची माहिती मिळताच बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि घटनास्थळी ग्रामस्थ व बघ्यांची मोठी गर्दी झाली. ग्रामस्थांनी तात्काळ राहुरी पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना कळविले. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह बाहेर काढून पंचनामा केला. यानंतर मृतदेह पुढील वैद्यकीय तपासणी व शवविच्छेदनासाठी पीएमटी रुग्णालय येथे पाठविण्यात आला असून प्रक्रिया सुरू आहे.

पिलर कोसळून एक ठार

जनता आवाज वृत्तसेवा

मुंबई : मुंबईतील मुलुंड (पश्चिम) परिसरात काल दुपारी मेट्रोच्या बांधकामादरम्यान एक अत्यंत दुर्दैवी आणि भीषण अपघात घडला. लाल बहादूर शास्त्री मार्गावर मेट्रो पिलरचा सिमेंटचा मोठा भाग अचानक कोसळल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून, अन्य तीन ते चार जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे मेट्रो प्रकल्पाच्या सुरक्षिततेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. काल शनिवारी दुपारी १२:२० च्या सुमारास मुलुंडमधील जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ मेट्रो मार्गिकेचे काम सुरू होते.

(पान ४ वर)

कांद्याला अपेक्षित बाजारभाव मिळेना?

कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत; आरणीतील कांदा लागला सडू

जनता आवाज वृत्तसेवा

राहुरी/श्रीरामपूर : गतवर्षीच्या हंगामातील आरणीत साठवून ठेवलेल्या कांद्याला अपेक्षित बाजारभाव न मिळाल्याने शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल करता आला नाही. त्यामुळे मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. अशातच यंदाच्या हंगामातील कांद्याची काढणी सुरू झाल्याने शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली असून आरणीत साठवून ठेवलेला कांदा व नव्याने काढलेला कांदा याला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.

सध्या बाजारात कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत असल्याने दरात सातत्याने घसरण होत आहे. परिणामी, मिळेल त्या दरात कांदा विक्री करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

राहुरी तालुक्याच्या पश्चिम भागात कांदा हे प्रमुख नगदी पीक मानले जाते. दरवर्षी मोठ्या प्रमाणावर या पिकाची लागवड केली जाते. मात्र, यंदा अवकाळी पाऊस व बदलत्या हवामानामुळे अनेक आरणीमध्ये (पान ४ वर)

कांद्याला हमीभाव जाहीर करावा

कांदा हे नगदी पीक असले तरी सलग दुसऱ्या वर्षी बाजारभावाची साथ मिळाली नाही. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. कांद्याला हमीभाव जाहीर करावा, साठवणूक व्यवस्था सक्षम करावी आणि बाजारातील दर स्थिर ठेवण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

जिल्ह्याच्या प्रगतीची मातृसंस्था जिल्हा बँक

माजी मंत्री बाळासाहेब थोरात; संगमनेर शाखेच्या नूतनीकरणाचा उद्घाटन समारंभ

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सहकार चळवळ बळकट करण्याबरोबर पीक कर्जाच्या माध्यमातून जिल्हा बँकेने शेतकरी उभा केला. ११ हजार कोटींच्या ठेवी हे जनतेच्या विश्वासाचे मोठे प्रतीक असून जिल्ह्याच्या विकासात मातृसंस्था म्हणून बँक कायम पाठीशी उभी राहिली असल्याचे गौरवोद्गार माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संगमनेर शाखेच्या तालुका विकास अधिकारी कार्यालयाचा नूतनीकरण उद्घाटन समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले हे होते.

यावेळी व्हा. चेअरमन ॲड माधवराव कानवडे, दुर्गाताई तांबे, रणजीतसिंह देशमुख, पांडुरंग घुले, बँकेचे संचालक गणपतराव सांगळे बाळासाहेब साळुंखे, संपतराव डोंगरे, आर. बी. राहणे, अजय फटांगरे, सुरेश थोरात, दीपक भोसले, ॲड. नानासाहेब शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे, तालुका विकास अधिकारी अशोक थोरात, कार्यालयीन अधीक्षक चेतन देशमुख यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सभागृह नूतनीकरण कामाचे उद्घाटन करण्यात आले. माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, जिल्हा सहकारी बँकेने जिल्ह्याच्या विकासात मोठे योगदान दिले असून जिल्ह्यातील विकासातून झालेल्या बदलाच्या पाठीशी जिल्हा बँक कायम मातृ संस्था म्हणून उभी राहिली आहे.

जिल्हा बँकेने अभ्यास गट करावा

शेतकऱ्यांची अवस्था, यापुढील पीक पद्धती, ऊस पीक याबाबत बँकेकडून एक अभ्यास कट करावा. याचबरोबर अमेरिका आणि भारत यांच्यात नव्यान होत असलेल्या कराराबाबतही अभ्यास झाला पाहिजे. अमेरिकेमधून भारतामध्ये येणाऱ्या शेतीमाल व वस्तूंवर कोणताही कर नाही. मात्र भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूंवर कर असणार आहे. या नवीन धोरणाबाबत बँकेने अभ्यास करावा, असेही माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले.

या बँकेमध्ये सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी ४४ वर्ष संचालक म्हणून काम करताना व्हा. चेअरमन व चेअरमन या पदावर १८ वर्ष काम केले. शिस्त पारदर्शकता सहकारात रुजवली. गाव पातळीवरील सेवा सोसायटी सक्षम करण्याबरोबर सचिवांबाबत तीर्थरूप भाऊसाहेब थोरात कायम काळजी करायचे.

(पान ४ वर)

ओबीसी दाखले मिळणारच : जरांगे

जनता आवाज वृत्तसेवा

कर्जत : यापूर्वी मराठवाड्यातील एकाही मराठा बांधवाला ओबीसी दाखला मिळत नव्हता. तब्बल ५८ लाख नोंदी सापडले आहेत. हळूहळू मराठवाड्यातील प्रत्येक मराठा समाजातील बांधवांना ओबीसी दाखला मिळेलच. त्यामुळे चार दोन टीका करणाऱ्यांकडे मी लक्ष देत नाही, असे प्रतिपादन मनोज जारंगे पाटील यांनी केले.

मनोज जरांगे पाटील काल कर्जतमधून पुढे जात असताना पत्रकारांशी बोलत होते. कर्जत येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सकल मराठा समाजाचे समन्वयक रावसाहेब धांडे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख डॉ. नितीन तोरडमल यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करत जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. मनोज जरांगे पाटील यांनी देखील कार्यकर्त्यांचे स्वागत अतिशय शांतपणे स्वीकारले. यावेळी समन्वयक रावसाहेब धांडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची १९ तारखेला असणाऱ्या जयंतीच्या उत्सवाच्या निमित्ताने (पान ४ वर)

कामगार देशाच्या औद्योगिक प्रगतीचा कणा

आ. संग्राम जगताप; एमआयडीसीतील इटॉन कंपनीतील कामगार प्रतिनिधींचा सन्मान

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : कामगार हा देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाचा कणा आहे. त्यांच्या माध्यमातूनच उद्योग क्षेत्र प्रगत होत असते. कामगार प्रतिनिधी ही कामगार आणि कंपनी व्यवस्थापन यांच्यामधील दुवा म्हणून अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर एमआयडीसी परिसरातील इटॉन सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या कामगारांच्या हितासाठी कार्यरत अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटनेच्या नवनिर्वाचित कामगार प्रतिनिधींचा सत्कार आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला संघटनेचे अध्यक्ष संतोष लांडे, किरण दाभाडे, तसेच नवनिर्वाचित कामगार प्रतिनिधी गौतम मेटे, किरण जपे, वैभव पादिर, वैभव तोडमल, नवनाथ वडघुले, प्रशांत शिंदे, प्रफुल गरुड आदी उपस्थित होते.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, कामगार प्रतिनिधींमुळे कामगारांच्या अडचणी व्यवस्थापनापर्यंत तातडीने पोहोचतात आणि प्रश्न मार्गी लागतात. औद्योगिक परिसरात समन्वय, विश्वास आणि पारदर्शकता राखून कामगार-व्यवस्थापन संबंध अधिक मजबूत करण्याची गरज आहे.

अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटना हे कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी सदैव लढणारे व्यासपीठ आहे. कामगारांच्या कल्याणासाठी घेतलेली पुढाकार वृत्ती ही कौतुकास्पद आहे.

अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष लांडे म्हणाले की, संघटनेच्या माध्यमातून कंपनीमध्ये कामगार हिताचे निर्णय घेण्यात येतात. कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवणे, त्यांचे प्रश्न सोडवणे आणि योग्य सुविधा मिळवून देणे हेच आमचे प्राधान्य आहे.

या कार्यक्रमामुळे संघटनेतील कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवनिर्वाचित प्रतिनिधींच्या माध्यमातून कामगारांच्या समस्या अधिक सुलभपणे मार्गी लागतील, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

संघटनेच्या या उपक्रमामुळे इतर औद्योगिक संस्थांमध्येही कामगार-व्यवस्थापन संवाद अधिक सशक्त होईल, असे मत व्यक्त करण्यात आले.

> एमआयडीसीतील इटॉन कंपनीमध्ये कामगारांना भेडसावणाऱ्या समस्या वेळेत सोडवण्यासाठी कामगार प्रतिनिधींची निवड करण्यात आली आहे. प्रतिनिधींमुळे व्यवस्थापनाशी संवाद साधणे सुलभ होते, तसेच कामगारांच्या मागण्या योग्य प्रकारे मांडता येतात.
>
> **– संतोष लांडे, अध्यक्ष : जिल्हा कामगार संघटना**

संगमनेर नगरपालिकेत नगराध्यक्षांच्या पतीचा हस्तक्षेप

कारवाई न झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागणार

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : संगमनेर नगरपालिकेच्या कारभारात नगराध्यक्षा मैथिली सत्यजित तांबे यांच्या पतीचा कथित हस्तक्षेप होत असल्याचा आरोप शिवसेना-भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी मुख्याधिकाऱ्यांकडे महायुतीच्या शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे केली आहे.

शासनाच्या धोरणानुसार महिलांना राजकारणात सक्रिय सहभाग मिळावा. यासाठी महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. तसेच महिला पदाधिकाऱ्यांना स्वतंत्रपणे काम करता यावे यासाठी शासन निर्णय काढण्यात आला असून, त्यानुसार महिला पदाधिकाऱ्यांच्या पतीला संबंधित संस्थेच्या कारभारात हस्तक्षेप करण्यास मनाई आहे.

दैनंदिन कामकाजात तांबेंकडून हस्तक्षेप

नगरपालिकेच्या निवडणुकीपासून नगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजात आ. तांबे सातत्याने हस्तक्षेप करत असल्याचे दिसून येत आहे. ते नगरपालिकेत प्रत्यक्ष उपस्थित राहत असून अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत बैठकाही घेत असल्याचा आरोप महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या कारभारात त्यांचा प्रत्यक्ष सहभाग असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणात राजकीय दबावामुळे कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. तर मुख्याधिकाऱ्यांविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात येईल, असा इशारा शिवसेना महायुतीच्या नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, शिवसेना शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे, अजित जाधव, विशाल एंगंदुल, शशांक नामन, अक्षय वर्पे, सिद्धार्थ तुरकने आणि अनिकेत चांगले यांनी दिला आहे.

मलनिस्सारण प्रकल्पाचे काम दर्जेदार करुन घेणार

अमित चिंतामणी; कामाच्या ठिकाणी जावून केली पाहणी

जनता आवाज वृत्तसेवा

जामखेड : मागिल सहा महिन्यांपासून जामखेड शहरात ८० कोटींच्या मलनिस्सारण गटार योजनेचे काम सुरू आहे. याबाबत रस्ते उखडणार आहेत. नागरीकांची थोडी गैरसोय होणार असली तरी पुढील ३० वर्षेपर्यंतचे हे नियोजन असून नागरीकांनी सहकार्य करावे. तसेच विरोधकांचे उपोषण पुर्वनियोजीत होते. नगरपरिषदेच्या माध्यमातून मलनिस्सारण प्रकल्पाचे काम चांगल्या दर्जाचे करुन घेणार आहोत, असे मत भाजपा नेते अमित चिंतामणी यांनी केले.

जामखेड शहरात ८० कोटींच्या सुरु असलेल्या मलनिस्सारण गटर योजनेचे काम सध्या सुरु आहे. मात्र सदरचे काम हे निकृष्ठ होत आसल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून याबाबत एक दिवस आमरण उपोषण केले होते.

याच अनुषंगाने दि. ११ फेब्रुवारी रोजी भाजपचे नेते अमित चिंतामणी, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात, नगरसेवक मोहन पवार, मनोज कुलकर्णी, प्रा. विकी घायतडक अर्जुन म्हेत्रे, हर्षद काळे, प्रविण होळकर, मुख्याधिकारी अजय साळवे, ठेकेदार सतिश देवकर, इंजिनिअर अमिर शेख, प्रफुल पाटील यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

> जामखेड शहरात ज्या ठिकाणी विकास कामे होणार आहेत. त्या ठिकाणी महाराष्ट्राचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या माध्यमातून चांगल्या दर्जाचे कामे होणार आहेत. त्यांच्या माध्यमातून या भुमिगत गटार योजनांचा शुभारंभ करण्यात आला आहे. दहेगाव ते जामखेड पाणीपुरवठा योजनाचे काम देखील प्रगती पथावर आहे. ते काम देखील जलद गतीने कसे पुर्ण होईल, यासाठी नगरपरिषदेच्या वतीने पाठपुरावा करणार आहोत.
>
> **– अमित चिंतामणी, भाजप नेते**

बाभुळवाडेतील केदारेश्वर मंदिरात महाशिवरात्रौत्सव

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : तालुक्यातील सर्वांत मोठे व उंच डोंगरावर असणारे श्री केदारेश्वर भगवान शंकराच्या मंदिरात आज, दि. १५ रोजी प्रति वर्षाप्रमाणे महाशिवरात्री निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व विश्वस्त मंडळानी दिली आहे.

पवित्र, मंगलमय व अध्यात्मिक ऊर्जेने परिपूर्ण अशा महाशिवरात्री निमित्त नगर जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या बाभुळवाडे येथील श्री केदारेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी सकाळी ७ वाजल्यापासून ते भाविक भक्तांच्या आगमनापर्यंत श्री केदारेश्वर भगवानाचे दर्शन घेता येईल. दुपारी ३ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत श्री केदारेश्वर भगवानांच्या पालखीची वाद्यांच्या गजरात फटाक्यांच्या आतिशबाजीत नामस्मरण व जयघोषात पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

सर्व भाविक भक्तांनी कुटूंब, नातेवाईक व मित्र परिवारासह श्री केदारेश्वर भगवान शंकराच्या चरणी नतमस्तक होऊन यथासांग दर्शन घेण्यासाठी या देवस्थानला भेट द्यावी, असे आवाहन ही श्री केदारेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व विश्वस्त यांनी केले आहे.

गोविंद आढाव यांचे निधन

जनता आवाज वृत्तसेवा

राहुरी : राहुरी तालुक्यातील केंदळ खुर्द येथील गोविंद मुरलीधर आढाव (वय ६८) यांचे निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजय, तीन मुले, पुतणे, सुना, मुली, पुतण्या, जावई, बहिण, मेहुणे, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते विशाल, वैभव व महेश यांचे वडील तर राहुरी साखर कारखान्याचे चेअरमन स्व. सर्जेराव गाडे यांचे मेहुणे होत. गोविंद आढाव यांनी केंदळ खुर्दचे सरपंच पद, केंदळ सेवा सोसायटीचे चेअरमन पदही भूषवले होते. तसेच वैभव पाणी वापर संस्थेचे ते संचालकही होते.

भाऊसाहेब कदमांना 'महाराष्ट्र भूषण' जाहीर

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय व मोलाचे योगदान दिल्याबद्दल भाऊसाहेब लक्ष्मण कदम यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या कार्याचा गौरव पाचव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार असून, त्यामध्ये भाऊसाहेब कदम यांची 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. संमेलनाचे संयोजक तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष नाना डोंगरे आणि श्री नवनाथ युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे यांनी ही माहिती दिली. भाऊसाहेब लक्ष्मण कदम हे टिळक रोड येथील ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटीच्या कार्यशाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.

'अजितदादांच्या निधनाने राजकारणात मोठी पोकळी'

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : मानवता हा सर्वोच्च धर्म मानणारे आणि लोकांमध्ये राहून लोकांसाठी आयुष्य वेचणारे नेतृत्व हे अजितदादामध्ये होते. आयुष्यभर शिस्त, प्रामाणिकता आणि पारदर्शक कारभाराची कास धरणाऱ्या या नेत्याने कधीही गुन्हेगारी प्रवृत्तीला आश्रय दिला नाही, ही त्यांची ठाम भूमिका होती. त्यांच्या निधनाने राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली असली, तरी त्यांनी दाखवलेला मार्ग समाजासाठी दिशादर्शक ठरेल, असे प्रतिपादन आमदार शिवाजीराव गर्जे यांनी केले.

पाथर्डी येथील गोरे मंगल कार्यालयात सर्वपक्षीय व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने आयोजित शोकसभेत ते बोलत होते. या सभेला माजी आमदार चंद्रशेखर घुले, गोकुळ दौंड, शिवशंकर राजळे, भिमराव फुंदे, भगवान दराडे, विष्णुपंत ढाकणे, बंडू पाटील बोरुडे, बाळासाहेब ताठे, सविता भापकर, मनिषा डांभे, अर्जुन धायतडक, रणजीत बेळगे, धन्यकुमार गुगळे, संतोष जिरेसाळ, अविनाश पालवे, पप्पू बोर्डे, सिताराम बोरुडे, दिगंबर गाडे, विष्णुपंत पवार, विक्रम चव्हाण, महेंद्र शिरसाट, भगवान बांगर, सचिन नागापुरे, भोरु म्हस्के, अंकुश गर्जे, हुमायून आतार, राहुल ढाकणे, गणेश पालवे, दत्तात्रय खेडकर, महेश अंगरखे आदी मान्यवर उपस्थित होते.

आ. गर्जे म्हणाले की, अजित पवार हे शाहू, फुले, आंबेडकरांच्या समतावादी विचारांचा वारसा जपत, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सर्वसमावेशक दृष्टिकोनावर चालणारे नेतृत्व होते. पुरोगामी परंपरेचा धागा घट्ट पकडत त्यांनी राज्यकारभारात ठाम भूमिका घेतली. अजितदादा हे जमिनीशी नाळ जोडून काम करणारे नेते होते.

> राज्यातील प्रत्येक तालुका, गाव आणि कार्यकर्त्यांशी अजितदादांची थेट ओळख होती. कोणत्या मतदारसंघात कोणती अडचण आहे, कोणत्या कार्यकर्त्याने कोणते काम केले आहे, याची त्यांना अचूक माहिती असे. ही केवळ राजकीय नोंद नव्हती, तर कार्यकर्त्यांशी असलेली आपुलकीची नाळ होती. आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात विकासकामांसाठी अजितदादांनी सातत्याने मार्गदर्शन व सहकार्य केले.
>
> **– चंद्रशेखर घुले, माजी आमदार**

विद्यार्थ्यांकडून कळसुबाई शिखराची स्वच्छता

जनता आवाज वृत्तसेवा

अकोले : कळसुबाई शिखर परिसराची स्वच्छता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी केली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राजूर यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित केली होती.

या निमित्ताने कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थी स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबरच संगमनेर-अकोले तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कळसुबाई शिखर ते कळसुबाई पायथा अशा अवघड मार्गावरील तसेच परिसरातील प्लास्टिक बाटली आणि प्लास्टिक साहित्य असा ३० गोण्या कचरा गोळा केला.

चिमुकल्यांच्या शिक्षणाची पायपीट थांबली!

मुक्ता ढोणे यांच्या भूदानामुळे हजारवाडीत अंगणवाडीचे थाटात उद्घाटन

जनता आवाज वृत्तसेवा

आश्वी : संगमनेर तालुक्यातील पानोडी अंतर्गत असलेल्या हजारवाडी येथील 'सुळवस्ती-कोळेकरवस्ती' अंगणवाडीच्या नूतन इमारतीचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या अंगणवाडीमुळे सुळवस्ती आणि ढोणेवस्तीवरील चिमुकल्यांचा शिक्षणासाठी होणारा ३ किलोमीटरचा त्रास आता वाचणार असून, त्यांच्या घरापर्यंत ज्ञानाचे दरवाजे खुले झाले आहेत. हक्काची अंगणवाडी मिळाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

या अंगणवाडीसाठी जागेचा प्रश्न अत्यंत बिकट झाला होता. मात्र, सामाजिक बांधिलकी जपत मुक्ता म्हाळू ढोणे यांनी मनाचा मोठेपणा दाखवून स्वतःची जागा अंगणवाडीसाठी दान दिली. त्यांच्या या दातृत्वामुळेच ही सुंदर इमारत उभी राहू शकली. याबद्दल मुक्ता ढोणे यांचा त्यांच्या पतीसह विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, त्यांचे वडील म्हाळू कांडाजी ढोणे यांचाही सन्मान करण्यात आला. म्हाळू ढोणे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून इमारतीचा लोकार्पण सोहळा पार पडला.

याप्रसंगी सरपंच गणपत हजारे आणि उपसरपंच विक्रमराजे थोरात यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अंगणवाडी मंजुरीपासून ते इमारत पूर्ण होईपर्यंत आलेल्या विविध प्रशासकीय आणि तांत्रिक अडचणींचा त्यांनी पाढा वाचला. सर्व सदस्यांनी एकजुटीने प्रयत्न केल्यामुळेच हा प्रकल्प पूर्णत्वास आल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी कारभारी हजारे, अंगणवाडी सेविका बेबी खेडकर, वंदना खंडागळे आणि वनिता जाधव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार अंगणवाडी सेविका शिला म्हाळू हजारे यांनी केले.

सोहळ्यास यांची होती उपस्थिती

ग्रामपंचायत सदस्या चंद्रकला भास्कर सूळ, देवराम हजारे, मधुकर सानप, सूर्यभान थोरात, विठ्ठल घोडेकर, सोपान सुळ, भास्कर सुळ, गवाजी कोळेकर, धोंडीबा हजारे, मुक्ता हजारे, सावळेराम रूपनर, शिवलाल कोळेकर, गोंडा कोरडकर, संतोष ढोणे, आनंदा तळेकर, रामा थोरात यांच्यासह अंगणवाडी सेविका, मदतनीस, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

झरेकाठी शिव आश्रमात महाशिवरात्रोत्सव

२६ वर्षांच्या परंपरेने रौप्य महोत्सवी टप्पा ओलांडला

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : शिर्डी येथील सिद्ध शिव योगीपीठ अंतर्गत असलेल्या झरेकाठी शिव आश्रमात यावर्षीही महाशिवरात्र उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे. गेल्या २६ वर्षांपासून सुरू असलेल्या या परंपरेने आता रौप्य महोत्सवी टप्पा ओलांडला असून, महंत ओम साई नागभूषण महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

यावर्षीच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे भाविकांना दिला जाणारा महाप्रसाद. तब्बल ९ क्विंटल साबुदाणा, ४ क्विंटल शेंगदाणे, ४ क्विंटल बटाटे आणि २५ डबे तेलाचा वापर करून साबुदाणा वडा तयार केला जाणार आहे. यासोबत साडेसातशे किलो खजूर आणि साडेसातशे किलो दही, असा शाही महाप्रसाद भाविकांना दिला जाणार आहे. या महाप्रसादासाठी विशेष स्वयंपाकी आणि स्वयंसेवकांची चमू कार्यरत आहे. या उत्सवासाठी केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर कर्नाटक आणि पंजाब या राज्यांतूनही मोठ्या संख्येने भक्तगण झरेकाठी परिसरात दाखल होणार आहेत. नागभूषण महाराजांनी सर्व भाविकांना या सोहळ्याचा आणि महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. स्थानिक प्रशासनासह ग्रामस्थही या नियोजनात हिरिरीने सहभागी झाले आहेत.

झरेकाठी नगरी झाली शिवमय

महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात भव्य मंडप आणि आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सरपंच अशोक वाणी, पोलीस पाटील सुदाम वाणी, डॉ. रंगनाथ गीते, निलेश कुटे, आदिनाथ वाणी, प्रसाद वाणी आणि सुधीर मामा यांच्यासह तरुणवर्ग परिश्रम घेताना दिसत आहेत. तर भक्ती, शक्ती आणि निसर्गाचा त्रिवेणी संगम असलेल्या या सोहळ्यासाठी झरेकाठी नगरी शिवमय झाली आहे.

पंचायत समितीच्या कारभारावर राजळेंची नाराजी

आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना लेखी अहवाल सादर करण्याचे आदेश

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : पंचायत समितीच्या कामकाजाबाबत तालुक्यात वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत आमदार मोनिका राजळे यांनी प्रशासनावर जाहीर नाराजी व्यक्त केली. आढावा बैठकीत मांडलेल्या प्रत्येक विभागाच्या प्रत्येक तक्रारीवर संबंधित अधिकाऱ्यांनी नेमकी कोणती कारवाई केली आणि कामाची पूर्तता कितपत झाली, याचा सविस्तर लेखी अहवाल आठ दिवसांत आमदार कार्यालयाकडे सादर करावा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

बैठकीस प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांच्यासह विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी व त्यांचे प्रतिनिधी, नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगलताई कोकाटे, धनंजय बडे, दिगांबर भवार, बंडूशेठ बोरुडे, अमोल गर्जे, बाळासाहेब अकोलकर, पुरुषत्तोम आठरे, भगवान साठे, विष्णुपंत अकोलकर, अंकुश कासुळे, रवींद्र वायकर, सुनील ओव्हाळ, एकनाथ आटकर, सुनील परदेशी, नारायण पालवे, शेषराव कचरे रामकिसन काकडे,रवींद्र आरोळे, पांडुरंग लाड आदी उपस्थित होते.

अन्यथा ठेकेदारांची बिले अदा करू नयेत

विकासकामे दर्जेदार व्हावीत, यासाठी अधिकाऱ्यांनी काटेकोर भूमिका घ्यावी, अन्यथा ठेकेदारांची बिले अदा करू नयेत, अशा स्पष्ट सूचना आमदार राजळे यांनी दिल्या. पाणीपुरवठा योजनांबाबत स्वतंत्र व सर्वसमावेशक बैठक घेऊन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित अधिकारी व ठेकेदार यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

बैठकीत भगवानगड पाणी योजनेवर झाली. या योजनेचे काम अतिशय संथ गतीने सुरू असून त्यात अनियमितता असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. कोट्यवधी रुपये खर्च झाले; मात्र गावांना प्रत्यक्षात पिण्याचे पाणी कधी मिळणार? असा थेट सवाल उपस्थित करण्यात आला. अधिकारी व ठेकेदारांची संयुक्त बैठक तातडीने बोलवावी, अशी मागणी करण्यात आली. त्यास प्रतिसाद देताना आमदार राजळे यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद भंडारी यांच्या समवेत सर्व संबंधित अधिकारी व ठेकेदारांची संयुक्त बैठक लवकरच घेण्यात येईल, असे जाहीर केले.

जलजीवन मिशनअंतर्गत अनेक गावांमध्ये कामे अर्धवट अवस्थेत असल्याचे चित्र बैठकीत समोर आले. काही ठिकाणी पाइपलाइन टाकली असली तरी पाण्याच्या टाक्या उभारलेल्या नाहीत; तर काही गावांत टाक्या असूनही विजजोडणी नसल्याने पाणीपुरवठा सुरू होऊ शकलेला नाही. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही केवळ चार गावांना पाणी मिळणे ही गंभीर बाब आहे अशी टीका उपस्थितांनी केली.

अधिकाऱ्यांनी योजनेला मुदतवाढ मिळाल्याचे सांगितले; मात्र ग्रामस्थांनी योजना कागदावरच आहे, प्रत्यक्षात काम सुरू नाही असा आरोप करत प्रशासनाला जाब विचारला.

शिर्डीत होणार सामुदायिक विवाह सोहळा

जनता आवाज वृतसेवा

शिर्डी : साईबाबांच्या पवित्र भूमीत दरवर्षी आयोजित केला जाणारा सर्वधर्मीय शाही सामुदायिक विवाह सोहळा यंदा आपल्या रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे.

अवघ्या सव्वा रुपयांत संपन्न होणारा हा २६ वा सामुदायिक विवाह सोहळा अक्षय तृतीयेच्या गोरज मुहूर्तावर १९ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात आणि शाही थाटात पार पडणार असल्याची माहिती मुख्य संयोजक कैलासबापू कोते यांनी दिली. सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याची मुहूर्तमेढ २००० साली शिर्डीचे पहिले नगराध्यक्ष कैलासबापू कोते आणि प्रथम महिला नगराध्यक्ष सुमित्रा कोते यांनी रोवली. गेल्या २६ वर्षांत महाराष्ट्र आणि राज्याबाहेरच्या २७०० हून अधिक जोडप्यांना विवाह बंधनात बांधण्याचे पवित्र कार्य कोते दाम्पत्याने केले आहे. या उपक्रमामुळे अनेक सामाजिक संघटनांनी शिर्डीच्या धर्तीवर शिर्डी ही सर्वधर्मीय ऐक्याचे प्रतीक मानली जाते.

यंदाचा हा २६ वा सोहळा या चळवळीला अधिक बळ देईल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. विवाह सोहळ्यात सहभागी होण्यासाठी राज्यभरातील वधू-वरांनी मोठ्या प्रमाणात नावनोंदणी करावी, असे आवाहन कैलासबापू कोते यांनी केले आहे. सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करण्यास प्रारंभकेला आहे. कोरोना काळातही नियमांचे पालन करून विवाह सोहळ्याचा खंड पडू दिला नाही.रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हा सामुदायिक विवाह सोहळा अधिक दिमाखदार होणार आहे. वधू-वरांना मंगळसूत्र, पोशाख आणि संसारोपयोगी वस्तू देण्यात येतील.

तसेच शाही मिरवणूक आणि उपस्थितांसाठी पंचपक्वान्नांचा महाप्रसाद देखील आयोजित केला जाईल. या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष म्हणून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पा. माजी खा. सुजय विखे पाटील, खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्यासह साधू-संत महंत आणि विविध राजकीय व सामाजिक नेते वधू-वरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

घटनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन महत्वाचा

सुनीता गडाख; 'वहिनी कर्तुत्वाचा सन्मान' कार्यक्रम

जनता आवाज वृत्तसेवा

सोनई : महिलांनी जीवन जगात असताना आयुष्यात येणाऱ्या जीवनदायी समस्या प्रश्न, जी घटना घडते याच्याकडे प्रेमाने, सकारात्मक व आशेने बघून त्या घटनेकडे दृष्टिकोन काय आहे? याला महत्त्व असून जीवनाला अर्थ कसा लावता येईल, हे समजले तर जीवन आनंददायी जगता येईल, असे प्रतिपादन माजी सभापती महिला चळवळीच्या नेत्या सुनिता गडाख यांनी केले.

'वहिनी कर्तुत्वाचा सन्मान' या कार्यक्रमात स्मार्ट किड्स अकॅडमी 'वूमन डे' निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होत्या. गडाख म्हणाल्या की, माझ्या आयुष्यात मोकळ्या मनाने निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य गडाख साहेब, भाऊ स्व. राजीव राजळे, माजी मंत्री शंकरराव गडाख व युवा नेते प्रशांतभाऊ गडाखांसह वडिलधाऱ्या यांच्या पुण्याईने मिळाले. या परिसरातील साहेबांच्या विचाराने मुलींचे शिक्षण आणि मुलांचा प्रपंच याला प्राधान्य देऊन खऱ्या अर्थाने मला मोठ करण्याचे श्रेय त्यांचं असल्याचे मत व्येक्त केले. याप्रसंगी सन्मान मूर्ती माजी सरपंच वडाळा बहिरोबा, मीनल मोटे (सामाजिक कर्तव्य) डॉक्टर गायत्री गडाख, नगर येथील रेशमी दसरे, ॲड. रेणुका पोशिंदा, अंजली खाडे विद्याताई दरंदले, बेलेकर वाडीच्या जोशी ताई यांचा महिला कर्तृत्व म्हणून सन्मान मानचिन्ह देऊन सुनिता गडाख, उषा गडाख, सरोज गडाख यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

उद्योजक थोरात यांना दिले मानपत्र

कर्जत : स्नेह प्रेम सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने कर्जत येथील उद्योजक दादासाहेब थोरात यांना त्यांनी केलेल्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत मानपत्र देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. संस्थेच्या कार्यासाठी त्यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमावेळी कर्जत येथील प्रतिष्ठित उद्योजक दीपकशेठ शिंदे व स्नेह प्रेम संस्थेचे अध्यक्ष फारुख बेग हे विशेष उपस्थित होते. मानपत्र प्रदान करताना संस्थेच्या वतीने दादासाहेब थोरात यांच्या सामाजिक जाणिवेचे व सेवाभावी वृत्तीचे विशेष कौतुक करण्यात आले. दादासाहेब थोरात यांनी आपल्या कुटुंबातील लग्नसोहळ्याच्या निमित्ताने एक अनोखा व प्रेरणादायी उपक्रम राबवला. खर्चिक दिखाव्याऐवजी समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देत त्यांनी स्नेह प्रेम सामाजिक प्रतिष्ठानला मदतीचा हात दिला. या संस्थेमध्ये सध्या ५० अनाथ मुलांचे संगोपन केले जात असून, त्यांच्या शिक्षण, आरोग्य व सर्वांगीण विकासासाठी ही मदत उपयोगी ठरणार आहे. ''आनंदाच्या क्षणी समाजातील वंचित घटकांचा विचार करणे ही खरी समाजसेवा आहे,'' अशी भावना दादासाहेब थोरात यांनी यावेळी व्यक्त केली. त्यांच्या या उपक्रमामुळे समाजातील इतर नागरिकांनीही अशा प्रकारे सामाजिक संस्थांना सहकार्य करावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

संजीवनी युनिव्हर्सिटीला 'टेडएक्स'चे सभासदत्व

जागतिक किर्तीच्या व्याख्यात्यांचे मंत्रमुग्ध करणारे सादरीकरण

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : संजीवनी युनिव्हर्सिटीने गुणवत्तेच्या जोरावर टेडएक्स या जागतिक पातळीवर व्यासपिठाचे सदस्यत्व प्राप्त केले. जागतिक किर्तीच्या व्याख्यात्यांच्या मंत्रमुग्ध करणारी व्याख्याने आणि अनुभवाचे सादरीकरणाचा समावेश असलेल्या कार्यक्रमाचे आयोजन करून या व्यासपिठासोबत आपले नाते जोडले. न्युयॉर्क येथे मुख्यालय असलेल्या टेडएक्सची जागतिक पातळीवरील व्यासपीठ अशी ओळख आहे.

या व्यासपिठाच्या सहकार्याने संजीवनी युनीव्हर्सिटीने, वेगवेगळ्या क्षेत्रात आपले वैशिष्टपूर्ण स्थान निर्माण करणाऱ्या व्यक्तींच्या अनुभव कथनाचा कार्यक्रम आयोजीत केला. ग्रामीण महाराष्ट्रात पहिल्यांदाच अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे अध्यक्ष नितिन कोल्हे, संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे, युनिव्हर्सिटीचे व्हाईस चांसलर डॉ. ए.जी. ठाकुर यांच्यासह युनीव्हर्सिटीचे प्राध्यापक या कार्यक्रमास उपस्थित होते.

यावेळी संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचे माजी विद्यार्थी व ईव्हीपी आणि चीफ इन्फॉर्मेशन अँड डिजिटल ऑफिसर, वेस्का, अमेरिका येथे कार्यरत असलेले डॉ. आकाश खुराणा म्हणाले की, यंत्रे विचार करू लागतात, तेव्हा आव्हान केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित राहत नाही. डॉक्टर ऋषिंद्र सिन्हा यांनी आवडीतील बदल करिअरच्या नव्या सीमा घडवतात या विषयावर प्रकाश टाकला. आवड गेमिंगला केवळ मनोरंजनातुन जागतिक करिअर परिसंस्थेत कशी रूपांतरीत करू शकते, याचा उलगडा त्यांनी केला. संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचे माजी विद्यार्थी व टेक महिंद्राचे चिफ इनोव्हेशन ऑफिसर डॉ. निखिल मल्होत्रा यांनी 'जेव्हा कृत्रिम बुध्दीमत्ता सर्जनशिल भागीदार बनते' या विषयावर आपले विचार मांडले. डॉ. भरत केळकर यांनी 'संकट काळात एक पाऊल पुढे जाण्याचा खरा अर्थ' या विषयावर आपले विचार मांडले. त्यांनी येमेन आणि सिरिया यांसारख्या संघर्षग्रस्त भागांमध्ये जाऊन युध्दग्रस्त नागरिकांना पुरवीलेल्या वैद्यकीय सेवेबाबतचे अनुभवकथन केले.

सामाजिक उद्योजिका सुमा उईके तसेच संजीवनी अकॅडमीची तीन पुस्तकांची बाल लेखिका आद्या आनंद काळे व बाल संशोधक सौल सारंग पाटील यांनी आपले अनुभव केले.

साईचरणी ११ लाखाचे सोन्याच्या दिव्याचे दान

शिर्डी : पुत्र प्राप्तीसाठी शिर्डीत येऊन साईबाबांना साकडे घातले होते. बाबांनी आमची इच्छा पूर्ण केली व आम्हाला एक मुलगा व एक मुलगी असे दोन बालक पुत्ररत्न म्हणून दिले. त्याची नवसपूर्ती म्हणून आम्ही साईचरणी दोन सोन्याचे दिवे अर्पण केले असल्याची माहिती भिवंडी येथील साईभक्त दाम्पत्याने दिली. साईभक्त भाविकांची मनोकामना पूर्ण करणाऱ्या साईबाबांवर देश-विदेशातील लाखो भाविकांची मोठी साईंच्या दर्शनासाठी येत श्रद्धा आहे. देश-विदेशातून वर्षाकाठी लाखो साईभक्त असतात. भाविक बाबांच्या झोळीत भरभरून दान देतात. भिवंडी, मुंबई येथील साईभक्त संतोष नार्वेकर यांनी १० लाख ९० हजार ६४२ रुपये किंमतीचे ७१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन दिवे साईचरणी अर्पण केले आहेत. साईभक्त संतोष नार्वेकर यांनी साईबाबांना दोन वर्षांपूर्वी पुत्रप्राप्तीसाठी नवस केला होता. त्यांना एक मुलगा व एक मुलगी झाल्यानंतर मोठा आनंद झाल्याने त्यांनी त्याची आठवण म्हणून दोन सोन्याचे दिवे दान केले आहे. त्याचा वापर ज्योत पेटवण्यासाठी होणार आहे.

पालिकेच्या उद्घाटनावर भाजपचा बहिष्कार

विखे पाटील व कर्डिले यांच्या निधीतून कामे असल्याचा दावा

जनता आवाज वृत्तसेवा

राहुरी : राहुरी नगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध विकासकामांच्या उद्घाटन समारंभात राजकीय वातावरण तापले आहे.

सत्ताधारी गटाकडून माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या हस्ते आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमावर विरोधी भाजप गटाने तीव्र नाराजी व्यक्त करत बहिष्कार टाकला आहे. उद्घाटन समारंभात विरोधी गटाच्या नगरसेवकांचा योग्य तो मानसन्मान राखला गेला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात भाजपा गटनेते राजेंद्र उंडे, विरोधी पक्षनेते अरुण साळवे तसेच नगरसेविका सिधुबाई डावखर, प्रियंका अमोल काशिद, मनीषा सचिन भोंगळ, मनीषा संतोष बर्डे, प्रसन्ना राजेंद्र वराळे आणि नयन शिंगी यांनी संयुक्त भूमिका मांडत सत्ताधारी गटाच्या कार्यपद्धतीवर सवाल उपस्थित केले आहेत.

विरोधी गटाच्या म्हणण्यानुसार, संबंधित विकासकामे ही जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधीतून करण्यात आलेली आहेत. त्यामुळे अशा कामांच्या उद्घाटनावेळी संबंधित लोकप्रतिनिधींना योग्य सन्मान देणे अपेक्षित होते.

मात्र, सत्ताधाऱ्यांनी एकतर्फी पद्धतीने कार्यक्रमाचे नियोजन करून विरोधी नगरसेवकांना दुय्यम स्थान दिल्याचा आरोप भाजप नगरसेवकांनी केला आहे. नगरपालिकेतील सर्व सदस्य हे लोकनियुक्त प्रतिनिधी असून विकासकामे ही संपूर्ण शहरासाठी असतात.

शहरातील प्रलंबित रस्त्यांच्या कामांना नव्याने गती

नगराध्यक्ष, नगरसेवकांनी केली पाहणी; अधिकाऱ्यांना सूचना

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या डॉक्टर जवेरी हॉस्पिटल ते नरोडे यांच्या घरापर्यंत (इंदिरापथ) या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाची नव्याने सुरुवात करून नगराध्यक्ष पराग संधान यांनी सहकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. ही कामे सुरू करण्यापूर्वी त्या कामांची गुणवत्ता आणि दर्जा टिकून राहण्यासाठी आवश्यक त्या सूचना करून कामे दर्जेदार व्हावी, यासाठी भूमिका घेत प्रलंबित रखडलेल्या कामाची गती वाढवली आणि झंजावात सुरू ठेवणार असल्याचे स्पष्ट केले. अनेक दिवसांपासून या रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली होती.

खड्डे, धूळ आणि पावसाळ्यात साचणारे पाणी यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच व्यापारी वर्गाला याचा विशेष त्रास होत होता. या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या डांबरीकरणाच्या कामाची गुणवत्ता, डांबराची जाडी, पाणी निचऱ्याची व्यवस्था तसेच कामाचा वेग यांची नगराध्यक्ष पराग संधान सखोल पाहणी केली.

रेल्वे मार्गासाठी कुकाण्यात उपोषण

भेंडा : कुकाणा (ता. नेवासा) येथे बेलापूर-परळी रेल्वेमार्गासाठी सुरू असलेल्या उपोषणाचा शुक्रवारी पाचवा दिवस होता. मात्र, अजूनही रेल्वे प्रशासनाने उपोषणाकडे पाठ फिरवली असून, ठोस आश्वासन मिळाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नसल्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे. रितेश भंडारी, रज्जाक इनामदार, सुरेश नरवणे यांनी सोमवारपासून उपोषण सुरू केले आहे. पाचव्या दिवशी रज्जाक इनामदार यांचे ९ किलो, सुरेश नरवणे यांचे ८ किलो, तर रितेश भंडारी यांचे ३ किलो वजन घटले आहे. कुकाणा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कैलास कानडे यांनी शुक्रवारी उपोषणकर्त्यांची वैद्यकीय तपासणी केली. बेलापूर-परळी रेल्वेमार्ग झाल्यास शिर्डी ते तिरुपती बालाजी अंतर ५०० कि.मी. कमी होईल. शिवाय शनिशिंगणापूर, नेवासा, माहूर, परळी वैद्यनाथ ही धार्मिक स्थळे एकमेकांशी जोडले जातील. रेल्वेमार्गामुळे नेवासा, शेवगाव, पाथर्डी, गेवराई तालुक्यांचा विकास होईल. या भागात असलेले साखर कारखाने, छोटे उद्योग व शेतकऱ्यांच्या मालास स्वस्त दरात बाजारपेठ उपलब्ध होईल, यासाठी हा रेल्वेमार्ग होणे गरजेचे आहे. बेलापूर-परळी रेल्वे मार्गाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डिसेंबर २०१७ मध्ये लेखी आश्वासन दिले होते. त्याला नऊ वर्षे पूर्ण होत आहे. त्यांनी हे आश्वासन पूर्ण करावे. तसेच केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडून या रेल्वे मार्गाला मंजुरीचे पत्र मिळवावे, अशी आमची अपेक्षा असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगर महामार्ग बनला मृत्यूचा सापळा

दुरुस्तीचे काम अर्धवट; रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : छत्रपती संभाजीनगर महामार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, हा महामार्ग मृत्यूला निमंत्रण देत आहे. महामार्गावर पडलेल्या खड्यांमुळे अनेक निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे, तरीही प्रशासन डोळेझाक करत असल्याचा आरोप होत आहे.

या विरोधात आता जेऊर पंचक्रोशीतील ग्रामस्थ आक्रमक झाले असून, महामार्गाची तात्काळ दुरुस्ती न झाल्यास जेऊर येथे तीव्र रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा युवा नेते राजू दारकुंडे यांनी दिला आहे. गेल्या आठ महिन्यांपासून या महामार्गाची दुरावस्था झाली आहे. प्रशासनाने दोन महिन्यांपूर्वी खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले होते, मात्र काही भागातील खड्डे बुजविल्यानंतर हे काम अचानक थांबविण्यात आले. दुरुस्तीचे काम पूर्ण न करताच का थांबविण्यात आले, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. धनगरवाडी आणि जेऊर परिसरात महामार्गाची अक्षरशः चाळण झाली आहे.

खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने दररोज दुचाकी चालक पडून जखमी होत आहेत, तर अनेक चारचाकी गाड्या उलटल्याच्या घटना घडल्या आहेत. या खड्यांमुळे वाहनांचे मोठे नुकसान होत असून प्रवाशांना हाडांचे विकार जडत आहेत. अपघातांमुळे अनेकांचे संसार उघड्यावर आले असून, याला जबाबदार कोण, असा सवाल संतप्त नागरिक विचारत आहेत. महामार्गाच्या दुरुस्तीसाठी यापूर्वी अनेकदा आंदोलने, गांधीगिरी आणि निवेदने देण्यात आली; मात्र प्रशासनाने त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले.

महामार्गाकडे कोणीही लक्ष देत नसल्याने तो आता बेवारस झाल्याची भावना व्यक्त होत आहे. शालेय विद्यार्थ्यांनाही जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. प्रशासनाने तात्काळ खड्डे बुजवून महामार्ग दुरुस्त करावा, अन्यथा समस्त जेऊर पंचक्रोशीतील ग्रामस्थांसह तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा राजू दारकुंडे यांनी दिला आहे.

> महामार्गाची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. सुमारे एक वर्षापासून नागरिक जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. महामार्गाची दुरुस्ती तसेच अपघातासाठी कारणीभूत ठरत असलेल्या ब्लॅक स्पॉट परिसरात अपघात टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याची गरज आहे. वारंवार मागणी करून देखील प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने पंचक्रोशीतील ग्रामस्थांसह तीव्र आंदोलन करण्यात येईल.
>
> **राजू दारकुंडे, युवा नेते**

संपादकीय

निकालांचा अन्वयार्थ

जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये महायुतीला मिळालेले यश हे राज्याच्या राजकीय पटावरील एक महत्त्वाचे वळण आहे. ग्रामीण जनतेने विकास, स्थैर्य आणि कार्यक्षमतेला प्राधान्य दिल्याचा हा स्पष्ट संदेश आहे; मात्र हा विजय जितका मोठा, तितकीच जबाबदारीही मोठी आहे. महायुतीने या विश्वासाचे सोने न केल्यास ग्रामीण मतदाराचा संयम फार काळ टिकत नाही, हे भविष्यात प्रत्ययाला येईल. इतिहासाने ते दाखवूनही दिले आहे. तीन टप्प्यांमध्ये झालेल्या राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुतीने यश मिळवले. अगोदर नगरपालिका आणि त्यानंतर झालेल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने यशाची कमान कायम राखली. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर महाविकास आघाडीच्या वाट्याला मात्र एकामागून एक पराभव येत आहेत. नगरपालिका आणि महापालिकांच्या निवडणुकीत भाजप हा पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला होता. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत त्याचीच पुनरावृत्ती झाली. विधानसभेपासून भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट अशा क्रमाने हे तीन पक्ष यश मिळवत होते. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या ऐन प्रचाराच्या काळात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने प्रचार थांबवला; परंतु ग्रामीण भागात राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थात्मक नेटवर्क आणि कार्यकर्त्यांचे जाळे यामुळे अजित पवार यांच्या पक्षाने जागांच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर उडी मारली. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या संख्येबाबत मात्र या दोन पक्षांमध्ये फारसा फरक नाही. महायुतीतील तीनही घटक पक्ष जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीतही लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीप्रमाणे प्रचार करत असताना महाविकास आघाडीतील एकाही पक्षाने या निवडणुकीत प्रचार न करता स्थानिक कार्यकर्त्यांवर ही जबाबदारी सोडली. सत्ता, साधने, पैसा, संसाधनांचा महायुतीने निवडणुकीत पुरेपूर वापर केला आणि विजयाचे नवे चित्र समोर आले. भारतीय जनता पक्षाच्या आमदारांची संख्या १३० पर्यंत आहे. त्यामुळे त्यांच्यावर आपापल्या जिल्ह्यात जास्तीत जास्त सदस्य निवडून आणण्याची जबाबदारी होती. आमदार आणि मंत्र्यांना टार्गेट देण्यात आले होते. टार्गेट पूर्ण न केल्यास भाजपमध्ये काय होते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यामुळे झटून सर्व कामाला लागले होते. भारतीय जनता पक्ष शहरी भागापुरता मर्यादित नाही, तर तो आता ग्रामीण भागापर्यंत विस्तारला आहे, हे वास्तव आता नवीन राहिलेले नाही. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीतही ते दिसले. जिल्हा परिषद निवडणुका या नेहमीच राज्याच्या राजकीय तापमानाचा अचूक अंदाज देणाऱ्या ठरतात. शहरातील प्रचाराच्या गोंगाटापेक्षा गावागावांमधून उमटणारा मतदारांचा सूर अधिक प्रामाणिक असतो. जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये भाजपला मिळालेले यश हे केवळ आकड्यांचे गणित नाही, तर ग्रामीण महाराष्ट्राच्या राजकीय मानसिकतेत मोठ्या बदलाचे स्पष्ट संकेत देणारे आहे. एके काळी शहरी, मध्यमवर्गीय पक्ष अशी ओळख असलेला भाजप आज जिल्हा परिषदांच्या सत्ताकेंद्रात पोहोचलेला दिसतो. हा प्रवास सहज घडला नसून संघटनात्मक बांधणी, सातत्यपूर्ण जनसंपर्क आणि विकासकेंद्री राजकारण यांचा परिपाक आहे.

जिल्हा परिषद ही ग्रामीण विकासाची खरी प्रयोगशाळा असते. पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार यासारखे प्रश्न थेट ग्रामीण मतदारांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेले असतात. या मुद्द्यांवर मतदार भावनिक घोषणांपेक्षा प्रत्यक्ष परिणाम पाहतो. महायुतीला मिळालेले यश हे याच वास्तवाचे द्योतक आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ गावागावांपर्यंत पोहोचवण्यात महायुतीने घेतलेली पुढाकाराची भूमिका, प्रशासनावर ठेवलेली पकड आणि स्थानिक नेतृत्वाला दिलेले स्वातंत्र्य याचा थेट फायदा या निकालांतून दिसून आला आहे. महायुतीच्या यशाइतकीच ठळक बाब म्हणजे विरोधकांची अपयशी रणनीती. एकत्र येण्याच्या घोषणा, जागावाटपातील मतभेद, स्थानिक नेतृत्वातील गटबाजी आणि ठोस मुद्द्यांचा अभाव यामुळे विरोधकांना मोठी किंमत मोजावी लागली आहे. ग्रामीण मतदार आता राजकीय प्रयोगांना कंटाळला आहे. सत्तेसाठी केलेली युती आणि विकासासाठीची युती यातला फरक तो स्पष्ट ओळखू लागला आहे. घराणेशाही, नातेवाइकशाहीला पूर्ण न नाकारता काही ठिकाणी लोकांनी त्यांच्यावर विश्वास टाकला, तर काही ठिकाणी आमदार, खासदार, मंत्र्यांच्या निकटवर्तीयांनाही पक्ष न पाहता झोपवले. विरोधक विकासाचे ठोस मॉडेल मांडण्यात अपयशी ठरले, तर महायुतीने 'कामावर मत' हा अजेंडा प्रभावीपणे राबवला. या निवडणुकीत महायुतीच्या यशामागे स्थानिक नेतृत्वाचा मोठा वाटा आहे. जिल्हा परिषद निवडणुका या केवळ वरच्या नेत्यांच्या भाषणांवर जिंकता येत नाहीत. गावपातळीवर कार्यकर्त्यांचे जाळे, सरपंच, पंचायत समिती सदस्य, स्थानिक पदाधिकारी यांची मेहनत निर्णायक ठरते. महायुतीने या सगळ्या घटकांना एकत्र बांधून ठेवण्यात यश मिळवले. स्थानिक नेत्यांना विश्वासात घेणे, त्यांचे प्रश्न ऐकणे आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढवणे ही महायुतीची ताकद ठरली. ग्रामीण भागाने दिलेला कौल अपेक्षांचाही भार घेऊन आला आहे. महायुतीवर आता विकासाचा वेग टिकवणे, योजनांची अंमलबजावणी अधिक पारदर्शक करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम करणे ही जबाबदारी अधिक वाढली आहे. जिल्हा परिषदांमधून पारदर्शक कारभार, निधीचा योग्य वापर आणि लोकाभिमुख निर्णय घेतले गेले, तरच हा विश्वास दीर्घकाळ टिकू शकेल. आजचा ग्रामीण मतदार सजग आहे, प्रश्न विचारणारा आहे. तो केवळ पक्ष पाहत नाही, तर कामगिरी मोजतो. त्यामुळे महायुतीसमोरचा खरा संघर्ष हा निवडणूक जिंकण्याचा नसून अपेक्षा पूर्ण करण्याचा आहे. जिल्हा परिषद निवडणूक ही वरच्या पातळीवरील नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांच्या कसोटीची परीक्षा असते. बूथ व्यवस्थापन, मतदार यादी तपासणी, स्थानिक प्रश्नांची नोंद आणि प्रत्यक्ष मतदारांशी संवाद या सगळ्या आघाड्यांवर भाजपने आघाडी घेतली. स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना स्वायत्तता देणे; पण एकाच वेळी केंद्रीय दिशा स्पष्ट ठेवणे, हे भाजपचे वैशिष्ट्य या निवडणुकीमध्ये पुन्हा अधोरेखित झाले.

समाजासाठी झटणाऱ्या आरोग्यविरा : डॉ.जयश्री थोरात

महाराष्ट्राचे प्रमुख नेते असलेले माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात हे स्वच्छ प्रतिमा, कार्यक्षमता, अविश्रांत काम करण्याची पद्धत, साधेपणा, सुसंस्कृतपणा यामुळे राज्यातील सर्वसामान्य जनतेचे आधारवड आहे. हाच समाजकारणाचा वारसा जोपासत उच्चशिक्षित असूनही महिला सबलीकरण व निरोगी समाजाचा ध्यास घेतलेल्या कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्री थोरात यांनी आपल्या कामातून तालुक्यातील जनतेत मोठी आपुलकी निर्माण केली केली असून त्या खऱ्या अर्थाने संगमनेर तालुक्यासह जिल्ह्याच्या आरोग्यविरा ठरल्या आहेत.

एमबीबीएसचे शिक्षण झाल्यानंतर डॉ. जयश्री थोरात यांनी ब्लडकॅन्सर मधून एमडी शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर देशातील नामांकित असलेल्या मुंबई येथील टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलमधील ब्लड कॅन्सर विभागात त्या कार्यरत झाल्या आहेत. वैद्यकीय सेवा करताना त्यांनी कधीही मोठेपणा दाखवला नाही. अगदी २४-२४ तास सलग प्रामाणिकपणे रुग्णांची सेवा करून त्यांनी रुग्णांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांनी कधीही परिवाराचे नाव पुढे केले नाही. सामान्य मुलगी म्हणून शिक्षण घेतले. एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्राचार्यांनी त्यांना विचारले सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात हे अहिल्यानगर जिल्ह्यातील आहेत. तुम्हीही थोरात आहात त्यावर डॉ.जयश्री थोरात यांनी सांगितले ते माझे आजोबा आहेत व प्राचार्यांनी विचारले माजी मंत्री नामदार बाळासाहेब थोरात यांच्या तुम्ही कन्या असूनही कधीही सांगितले नाही. त्यावेळी अत्यंत नम्रपणे डॉ. जयश्री थोरात यांनी सांगितले की, माझे वडील, आजोबा यांचा साधेपणा हे आमच्या परिवाराचे संस्कार आहे. शिक्षणामध्ये मी कशाला त्यांचे नाव पुढे घेऊ. यावर प्राचार्यांनी या मुलीचे खऱ्या अर्थाने कौतुक केले.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सेवाव्रत त्यांनी कायम जपला. कॅन्सरसारख्या भयावह आजाराला सर्वजण घाबरतात. मात्र स्वातंत्र्य सैनिकाची नात असलेल्या लढवय्या आरोग्यविरेने अनेक रुग्णांवर शस्त्रक्रिया व उपचार करून कॅन्सरला हरवले आहे. वाढता कॅन्सर हे समाजासाठी अत्यंत चिंताजनक आहे. याचा विचार करून डॉ.जयश्री थोरात यांनी कॅन्सरबाबत जनजागृती सुरू केली.

मागील सहा वर्षापासून एकविरा फाउंडेशनच्या माध्यमातून संगमनेर तालुक्यात युवतींचे मोठे संघटन करून तरुणींसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. आरोग्य शिबिरे, गणपती काळामध्ये निर्माल्याचे संकलन, ओला व सुका कचरा व्यवस्थापन, कॅन्सरविषयी जनजागृती, हिमोग्लोबिन तपासणी असे सातत्याने विविध उपक्रम राबवले आहे.

दोन वर्ष कोरोनाच्या काळामध्ये टाटा हॉस्पिटलमध्ये रात्रंदिवस काम करून कॅन्सरसह कोरोना रूग्णांवर उपचार केले. यानंतर वसंत लॉन्स येथे कोरोना काळामध्ये काम करणाऱ्या आरोग्य सेविका, अंगणवाडी व आशा सेविका यांचा केलेल्या कौतुक सोहळा तर राज्यभरासाठीचा पॅटर्न ठरला. आजोबा तीर्थरूप सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात, वडील लोकनेते बाळासाहेब थोरात, आई सौ. कांचनताई थोरात व माजी आमदार डॉ.सुधीर तांबे व सौ. दुर्गाताई तांबे यांचेकडून समाजकार्याचा वारसा घेऊन डॉ. जयश्री थोरात अविरतपणे काम करत आहेत.

संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा आहे. पठार भाग, प्रवरा पट्टा व तळेगाव पट्टा अशा भौगोलिकदृष्ट्या तीन विभागात विभागलेला असूनही प्रत्येक गावात वाडीवस्तीत जाऊन डॉ. जयश्री थोरात यांनी प्रत्येक कुटुंबाची अस्थिवाईकपणे चौकशी केली आहे. तालुक्यातील विविध कार्यक्रमांना त्यांची उपस्थिती, महिलांशी सहजपणे होणारा संवाद, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, नम्रपणा, साधेपणा हा त्यांचा स्थायीभाव पाहून प्रत्येकाचे काळीज अभिमानाने भरून येत आहे.

ज्या ज्या वेळेस संगमनेरमध्ये मोठमोठे कार्यक्रम आयोजित होत असतात त्या त्या वेळेस आलेल्या प्रत्येकाची अत्यंत जिव्हाळ्याने व आस्थेवाईकपणे चौकशी करणाऱ्या डॉ. जयश्री थोरात या प्रत्येकाला आपल्या कुटुंबातील सदस्य वाटत आहेत.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली यशोधनच्या माध्यमातून जनसेवेचे व्रत त्यांनी जपले आहे. सामाजिक राजकीय कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्षपद सांभाळताना युवकांमध्ये चैतन्य निर्माण केले आहे. राजकीय संकटे आली; परंतु त्या कधीही डगमगल्या नाहीत. शांत आणि संयमाने त्यावर मात केली. कठीण प्रसंगातील त्यांच्या शांततेचे राज्यभर कौतुक झाले. अशा या आरोग्यविरा असलेल्या कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्री बाळासाहेब थोरात यांना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा.

पोलीस भरतीचे स्वप्न अधुरेच! पुण्याला जाताना भीषण अपघात

जनता आवाज वृत्तसेवा

पिंपरी निर्मळ : पोलीस दलात भरती होऊन देशसेवा करण्याचे स्वप्न उराशी बाळगलेल्या एका होतकरू तरुणाचा काळाने घाला घातला आहे. पुणे येथे पोलीस भरती प्रक्रियेसाठी दुचाकीवर जात असताना नारायणगाव जवळ झालेल्या भीषण अपघातात साईकीरण भागवत शेलार (वय २५) या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण राहाता तालुक्यासह पिंपरी निर्मळ गावावर शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी निर्मळ येथील साईकीरण शेलार हा आपल्या मित्रासह शुक्रवारी दुचाकीवरून पुणे येथे पोलीस भरतीसाठी निघाला होता. प्रवासादरम्यान नारायणगाव हायवेवरील 'चौदा नंबर' परिसरात त्यांच्या दुचाकीला एका भरधाव डंपरने जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, यामध्ये साईकीरणला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली.

साईकीरण हा अत्यंत मनमिळावू आणि कष्टाळू तरुण म्हणून गावात परिचयाचा होता. त्याचे वडील भागवत शेलार हे पिंपरी निर्मळ सेवा संस्थेत लिपिक म्हणून कार्यरत आहेत. कुटुंबाचा मोठा आधार असलेल्या साईकीरणच्या निधनाने शेलार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पोलीस भरतीसाठी त्याने मोठी तयारी केली होती, मात्र भरती केंद्रावर पोहोचण्यापूर्वीच वाटेतच त्याचा मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

काल पिंपरी निर्मळ येथे शोकाकुल वातावरणात साईकीरणवर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याच्या पश्चात आई, वडील, लहान भाऊ आणि चुलते असा परिवार आहे. एक तरुण आणि जिद्दी युवक अशा प्रकारे अपघातात दगावल्याने रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, हायवेवरील अवजड वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

टाकळीभान येथे आज महाशिवरात्रीनिमित्त किर्तन व महाप्रसादाचे वाटप

जनता आवाज वृत्तसेवा

टाकळीभान : दरवर्षी प्रमाणे याही वर्षी टाकळीभान येथील पंचक्रोशीतील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले शंभू महादेव मंदिर येथे आज आई रविवार दि.१५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे

महाशिवरात्री निमित्त सकाळी ९ ते ११ वाजता,राष्ट्रीय कीर्तनकार सचिन महाराज ढोले यांचे जाहीर हरि किर्तन होणार आहे. तदनंतर महाशिवरात्र निमित्त समस्त देणगीदारांकडून सुमारे एक हजार किलो साबुदाणा खिचडी महाप्रसाद व केळी आदी फराळांचा वाटपाचा कार्यक्रम शंभू महादेव मंदिराच्या भव्य प्रांगणात संपन्न होणार आहे .

तरी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन, ताई प्रतिष्ठान व कान्होबा खंडागळे मित्र मंडळ , महादेव यात्रा कमिटी, कारभारी चांडे, प्रकाश नाईक, शंभू महादेव भक्त मंडळ, श्रीराम पायी दिंडी, साईबाबा पायी दिंडी व समस्त देणगीदार ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरून

आता दप्तराची चिंता मिटली?

आधीच पाठ्यपुस्तके आणि मध्यान्ह भोजन देण्यात येत असताना आता दप्तराचीही सोय केल्याने सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी सुविधा अधिक वाढणार आहेत.

मात्र, ज्या महानगरपालिकांमध्ये आधीपासूनच विद्यार्थ्यांना दप्तर देण्याची योजना सुरू आहे किंवा त्या उद्देशाने निधी वितरित केला जातो, त्या शाळांना या नव्या योजनेतून वगळण्यात येणार आहे. उर्वरित सर्व सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्येच या निर्णयाची अंमलबजावणी होईल. त्यामुळे राज्यातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना थेट लाभ मिळणार असला तरी काही महापालिका क्षेत्रांमध्ये आधीच्या योजनांमुळे स्वतंत्र अंमलबजावणी होणार नाही.

या निर्णयानंतर पालकांकडून समाधान व्यक्त होत असले तरी दप्तरांच्या गुणवत्तेबाबत अपेक्षा मांडल्या जात आहेत. बाजारात उपलब्ध असलेल्या हलक्या दर्जाच्या किंवा लवकर खराब होणाऱ्या दप्तरांचा पुरवठा होऊ नये, अशी मागणी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून मजबूत, हलके आणि दीर्घकाळ टिकणारे दप्तर उपलब्ध करून द्यावेत, अशी अपेक्षा आहे. नवीन शैक्षणिक वर्षापासून या उपक्रमाची अंमलबजावणी सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सरकारी शाळांमध्ये आधीच मोफत पाठ्यपुस्तके, मध्यान्ह भोजन आणि इतर सुविधा दिल्या जात आहेत. आता मोफत दप्तराची भर पडल्याने पालकांवरील शैक्षणिक खर्च आणखी कमी होणार आहे. तरीदेखील अनेक ठिकाणी महापालिका आणि जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या घटत असल्याचे चित्र आहे. ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे वाढते प्रमाण आणि त्याविषयीचा पालकांमध्ये असलेला आकर्षण यामुळे सरकारी शाळांवर परिणाम होत असल्याचे दिसते. काही ठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्याने शाळा बंद करण्याची वेळ येत आहे, तर काही भागांत दोन शाळांचे एकत्रिकरण केले जात आहे.

जिल्ह्याच्या प्रगतीची मातृसंस्था जिल्हा बँक

सचिवाबाबत त्यांची मोठी तळमळ असायची. संगमनेर शाखेच्या या इमारतीचे भूमिपूजन माझे आजोबा संतोजी थोरात यांच्या हस्ते २९ जुलै १९७६ रोजी झाले. पन्नास वर्षाच्या या कार्यकालमध्ये मोठा बदल झाला असून बँकेने शेतकऱ्यांचा मोठा विश्वास संपादन केला आहे आणि त्यामुळे जिल्हा बँकेत ११००० कोटींच्या ठेवी बँकेमध्ये आहेत. संगमनेर तालुक्यामध्ये कर्ज वसुली देण्याची वसुलीची चांगली संस्कृती कायम राहिली असल्याचे ते म्हणाले. चंद्रशेखर घुले म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात व स्वर्गीय मारुतराव घुले यांचा स्नेहबंध कायम राहिला. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्याने कायम राज्याला दिशा दिली आहे. संगमनेरचे दिशादर्शक काम हे सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. सहकाराची ही परंपरा आपण पुढे घेऊन जात आहोत. ७५ वर्षांमध्ये बँकेने अत्यंत चांगले काम केले असून काळानुरूप बदल करावे लागणार आहेत.

पीक कर्ज, शेती कर्ज, ऊस कर्ज यापुढे जाऊन अधिकाऱ्यांनी कार्पोरेट बँकिंग प्रणाली राबवण्यासाठी अधिक काम करावे. याचबरोबर बँकेने नव्याने ८ टक्के व्याजाने सोनेतारण कर्ज सुरू केले असून आगामी काळामध्ये जिल्ह्याच्या सर्व सोसायट्यांच्या माध्यमातून किंवा बारकोड राबवण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. ॲड. माधवराव कानवडे म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात व त्यांच्या काळातील सर्व सहकारी अत्यंत दूरदृष्टीचे होते सहकाराला त्यांनी दिशा दिली आणि त्याच वाटचालीवर आज बँकेचे कामकाज सुरू आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सहकार जपला असून शेती ,शिक्षण, सहकार, ग्रामीण विकास, दूध अशा सर्व क्षेत्रात त्यांनी मोठे काम केले असल्याने ते खरे विकास पुरुष ठरले असल्याचे ते म्हणाले. गणपतराव सांगळे म्हणाले की, आगामी काळामध्ये सोसायटी सक्षमीकरणासाठी सरकारकडून अनुदान मिळावे .याचबरोबर संस्थापातळीवरील सचिवांना केडरमध्ये सहभागी करून घ्यावे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले. तर तालुका विकास अधिकारी अशोक थोरात यांनी आभार मानले. यावेळी संगमनेर तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी,सेवा सोसायटीचे चेअरमन, सेक्रेटरी, बँकेचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सपकाळ यांना लाज वाटली पाहिजे

दुर्दैवी आहे. त्या ठिकाणी जे काम चालले होते, त्यात स्लॅब पडला. त्यात दुर्दैवी मृत्यू देखील झाला आहे, त्यांच्या कुटुंबीयांसोबत आमच्या प्रार्थना आहेत. जे जखमी झाले आहेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची सगळी काळजी ही एमएमआरडीएच्या माध्यमातून आणि राज्य सरकारच्या माध्यमातून घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हा जो संपूर्ण प्रकार घडलेला आहे, यात आवश्यक ती काळजी घेतली गेली आहे की नाही याची चौकशी केली जाईल. अर्थातच काळजी घेतली असती तर अशी परिस्थिती आली नसती. याला कोण जबाबदार आहे, त्यांच्यावरही कारवाई केली जाईल आणि तात्काळ जिथे जिथे काम चालू आहे तिथे सेफ्टी ऑडिट करून त्या ठिकाणी अशी घटना घडणार नाही या प्रकारचे प्रयत्न केले जातील. मृतकांच्या परिवाराला शासनाकडून मदत केली जाणार असल्याचेही फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

कांद्याला अपेक्षित बाजारभाव मिळेना?

साठवलेला निम्म्याहून अधिक कांदा सडून गेला आहे.

राहुरी-श्रीरामपुर तालुक्यातही आरणीतील कांदा खराब झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मेहनतीने पिकवलेले उत्पादन हातातून निसटत असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. उत्पादन खर्च, मजुरी, खत-बियाणे आणि वाहतूक खर्च वाढले असताना १ क्विंटल कांद्याला १ हजार रुपयापेक्षाही अत्यंत कमी बाजारभाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

पान १ वरून

टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे योद्धे

लाच घेतली, हे प्रकरण फार छोटे आहे. हे संपूर्ण सरकारच लाचखोर आहे. नरहरी झिरवाळ यांच्यावर कारवाई तर व्हायलाच पाहिजे पण कोट्यवधी रुपये खाणारे देवेंद्र फडणवीसांवर काय कारवाई करणार हे आधी सांगा. या असंवैधानिक सरकारचा आम्ही निषेध करतो.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, अजितदादा आता राहिले नाही. शरद पवार आणि अजित पवार हे महाराष्ट्राचे भूमिपुत्र आहेत, त्यांचा पक्ष त्यांच्या विचाराने चालेल का? तटकरे आणि पटेल हा पक्ष चालवणार आहेत हा कळीचा मुद्दा आहे. पटेल यांचा तो मी नव्हेच म्हणण्याचा जुना स्वभाव आहे, ते पुन्हा एकदा महाराष्ट्रासमोर आले आहे. अजितदादा हे चांगले प्रशासक होते. त्यामुळे त्यांच्या निधनाची बातमी आल्यानंतर त्यांच्या कार्यालयातील लोकांनी लूट करण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही सपकाळ यांनी म्हटले आहे.

भूम परंड्यात सहा महिन्यानंतर केंद्रीय पथक पाहणीसाठी आले. यावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, हे वरातीमागून घोडे आहे आणि आता शेतकऱ्यांना ते वाटाण्याच्या अक्षता लावून निघून जातील. तसेच मुनगंटीवार यांचा बंगला घेण्याइतपट माझी ऐपत नाही. मात्र रेडी रेकनरच्या दरात ते जर बोलत असतील तर मी त्यांना कळवेल, असेही सपकाळ म्हणाले. तसेच अमेरिकेशी केलेल्या करारामुळे शेतकऱ्यांना कुठलाही फायदा होणार नाही. नरेंद्र सरेंडर हे शेतकऱ्यांच्या गळ्यात फास लावल्यावरच शांत बसतील, अशी टीका सपकाळ यांनी केली.

पिलर कोसळून एक ठार

यावेळी मेट्रोच्या पिलरचा एक अवजड सिमेंटचा स्लॅब अचानक निखळून खाली रस्त्यावरून जाणाऱ्या एका ऑटो रिक्षा आणि कारवर कोसळला. हा आघात इतका भीषण होता की, रिक्षाचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. ज्यावेळी हा अपघात झाला, तेव्हा रिक्षामध्ये चालक आणि तीन प्रवासी असे एकूण चार जण प्रवास करत होते.

अपघाताची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल, स्थानिक पोलीस, मेट्रो प्राधिकरणाचे कर्मचारी आणि १०८ रुग्णवाहिका सेवा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, दुर्दैवाने उपचारादरम्यान एका जखमी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची पुष्टी करण्यात आली आहे. उर्वरित जखमींवर उपचार सुरू असून, त्यापैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. मृत व्यक्तीची ओळख पटवण्याचे काम सध्या पोलीस करत आहेत.

या अपघातामुळे मेट्रो प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर स्थानिक नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, ज्या ठिकाणी मेट्रोचे एवढे मोठे काम सुरू होते, तिथे सुरक्षेसाठी आवश्यक असलेले 'बॅरिकेड्स' लावण्यात आले नव्हते. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी या भागातील बॅरिकेड्स हटवण्यात आले होते, अशी प्राथमिक माहिती समोर येत आहे. अशा धोकादायक कामाच्या ठिकाणी योग्य सुरक्षा उपाययोजना न केल्यामुळेच हा निष्पाप नागरिकाचा बळी गेल्याचा आरोप होत आहे.

या दुर्घटनेनंतर एलबीएस रोडवरील वाहतूक मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळाचा ताबा घेऊन वाहतूक इतर मार्गांवर वळवली आणि रस्त्यावरील राडारोडा हटवण्याचे काम सुरू केले. मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार, मेट्रोच्या खांबाचा सिमेंटचा भाग नेमका तांत्रिक बिघाडामुळे पडला की कामातील हलगर्जीपणामुळे, याचा सखोल तपास सुरू आहे. मेट्रो प्राधिकरण आणि कंत्राटदाराकडून सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन झाले असल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

ओबीसी दाखले मिळणारच : जरांगे

आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमांची निमंत्रण पत्रिका देऊन जरांगे पाटील यांना सर्व कार्यक्रमासाठी आपण उपस्थित रहावे, अशी विनंती केली. यावेळी जरांगे पाटील यांनी निमंत्रण स्वीकारले. शिवजयंती अतिशय उत्साहात आणि जोरदारपणे आणि तेवढ्याच शांतपणे साजरी करा, असे म्हणत उपस्थित सर्व कार्यकर्त्यांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी मुंबई येथे जे आंदोलन झाले ते अतिशय निर्णायक होते. मोठे यश या आंदोलनाने आम्हाला मिळाले आहे. चार दोन जण टीका करतात. मात्र त्यांच्या टिकेकडे मी लक्ष देत नाही. तब्बल ५८ लाख नोंदी सापडले आहे. यामुळे या गॅझेटला अतिशय महत्त्व आहे. पूर्वी मराठा समाजातील बांधवांना युवकांना एक ओबीसी दाखला मिळवण्यासाठी किती संघर्ष करावा लागत होता. त्यांची किती हाल होत होते. बऱ्याच वेळा मोठ्या रकमा देखील दाखला मिळवण्यासाठी दिल्या जात होत्या. मात्र आपल्या आंदोलनामुळे मोठे यश मिळाले आहे.

स्वच्छता अभियानात तीन टन कचरा साफ

जनता आवाज वृत्तसेवा

नेवासा : तीर्थक्षेत्र नेवासा नगरीचे वैभव जपण्यासाठी आणि शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या मासिक स्वच्छता अभियानाला मोठा प्रतिसाद मिळाला. या मोहिमेत शहरातील विविध भागांतून तब्बल तीन टन कचरा संकलित करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली.

स्वच्छता दूतांनी या अभियानांतर्गत बाजार तळ परिसर, जिल्हा बँक परिसर आणि संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर रोड या प्रमुख मार्गांवर स्वच्छता केली. विशेष म्हणजे, केवळ सूचना न देता नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी स्वतः हातात फावडे आणि कुदळ घेऊन स्वच्छतेत सहभाग नोंदवला, ज्यामुळे स्वयंसेवकांचा उत्साह अधिक वाढला होता. या अभियानात नेवासा येथील सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर सहभागी झाले होते. यामध्ये वृक्ष मित्र अमृत फिरोदिया, रा.स्व. संघाचे कार्यवाह सतीश मुळे सर, अनंता नळकांडे, ज्येष्ठ कार्यकर्ते गफूरभाई बागवान, रामभाऊ केंदळे, व्यापारी बालेंद्र पोतदार, अब्बास बागवान, हमीद बागवान, संदीप आलवणे, युवा कार्यकर्ते संदीप भांड, आकाश देशमुख आणि योगेश आलवणे यांनी श्रम दान केले.

पाथर्डीत दलित पँथर पदाधिकाऱ्यांसह १२ जणांविरुद्ध गुन्हा

दोन लाखांची खंडणी मागितल्याचा आरोप

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : तालुक्यातील मिरी येथे प्लॉटलगत बांधलेल्या बाथरूमच्या वादातून दोन लाख रुपयांची खंडणी मागून मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी १२ जणांविरुद्ध पाथर्डी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत लोणी (ता. राहता) येथील एका महिलेने दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, पाथर्डी तालुक्यातील मिरी येथे तिच्या मालकीचा प्लॉट असून त्या ठिकाणी शेडचे दोन गाळे बांधलेले आहेत. प्लॉटच्या शेजारी राहणारे दानियल शाहू मिरपगार यांनी प्लॉटसमोरच शौचालय व बाथरूम बांधल्याने त्याचा तीव्र दुर्गंध गाळ्यात येत असल्याची तक्रार तिने केली होती.

दि. ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी प्लॉटवर गेल्यानंतर तिने दानियल मिरपगार यांना शौचालय दुसरीकडे हलविण्याबाबत सांगितले असता, त्यांनी संतापून पत्नी सविता मिरपगार व मुली प्रेरणा व प्रिती मिरपगार यांच्या मदतीने तिचा ब्लाऊज फाडून विनयभंग केल्याचा तसेच खोट्या ॲट्रॉसिटी गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत आहे. दरम्यान, संबंधित शौचालय हे शासकीय अतिक्रमणात येत असल्याची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे करण्यात आली होती. त्यानुसार दि. २० जानेवारी २०२६ रोजी ग्रामसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अतिक्रमण हटविले. मात्र, आदेशाचे उल्लंघन करून पुन्हा त्याच ठिकाणी बाथरूम उभारण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दि. २२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता फिर्यादी आपल्या सहकाऱ्यांसह प्लॉटवर असताना दलित पँथरचे रायगड जिल्हाध्यक्ष अदित्य कदम, विशाल मिरपगार, नितीन मिरपगार, सोमनाथ मिरपगार, आमोल मिरपगार, अक्षय मिरपगार, विशाल मिरपगार, रविंद्र मिरपगार, दानियल मिरपगार, सविता मिरपगार, प्रेरणा मिरपगार व प्रिती मिरपगार हे तेथे आले. त्यांनी प्लॉटच्या पाठीमागील बाजूस बोलावून दोन लाख रुपयांची मागणी केली. त्यातील एक लाख रुपये दानियल मिरपगार यांना व उर्वरित एक लाख रुपये इतरांसाठी देण्याची मागणी केल्याचा आरोप आहे.

हात-पाय तोडण्याची धमकी

फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर पैसे दिले नाहीत तर हातपाय तोडू, नवऱ्याला जीवे मारू अशी धमकी देत शिवीगाळ करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तसेच पूर्वी खोटा गुन्हा दाखल करून दबाव टाकल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी वरील सर्व १२ जणांविरुद्ध खंडणी, मारहाण, विनयभंग, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

धनगर समाज आरक्षणासाठी मुंबईत आंदोलन छेडणार

जनता आवाज वृत्तसेवा

शिर्डी : राज्यातील धनगर आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा पेटला असून शिर्डी येथे बुधवारी झालेल्या धनगर समाजाच्या प्रमुख नेत्यांच्या समाज बांधवांच्या आणि बैठकीत आरक्षणासाठी आरपारच्या लढाईचा निर्णय घेण्यात आला आहे. धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण लागू करावे, या मागणीसाठी लवकरच मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन छेडण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

या बैठकीत बोलताना धनगर समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांनी आक्रमक पवित्रा घेतला. राज्य सरकारने यापूर्वी दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनगर समाजाला दिलेला शब्द आता पाळावा, अशी मागणी त्यांनी केली. केवळ आश्वासने नकोत तर आता प्रत्यक्ष कृती हवी, अशी भावना समाज बांधवांमध्ये असल्याचे त्यांनी सांगितले. धनगर समाजाल आरक्षणाचा शासन निर्णय प्रत्यक्ष हातात मिळाल्याशिवाय मुंबईतील आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशारा बोऱ्हाडे यांनी सरकारला दिला आहे.

या आंदोलनात राज्यभरातील हजारो धनगर बांधव मुंबईत एकवटणार असून आरक्षणाच्या या निर्णायक लढाईत सर्व धनगर नेत्यांनी आपापसातील मतभेद विसरून एकत्र यावे आणिसक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कृतज्ञतेचा संवाद ठरेल प्रेरणादायक

शंकरराव गडाख; महाशिवरात्र सोहळ्याची बैठक

जनता आवाज वृत्तसेवा

सोनई : साहित्य व समाजोपयोगी जडणघडणीत मोलाचे कार्य असलेल्या व राज्यात प्रेरणादायक व्यक्तिमत्त्व म्हणून नावलौकिक असलेल्या व्यक्तींना कृतज्ञता पुरस्कार दिल्यानंतर होणारा संवाद व्यक्तिमत्त्व विकासकरिता, तसेच प्रेरणास्त्रोत ठरणार असल्याने आयोजित सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन माजी जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी केले.

सोनई सेवा संस्थेच्या सभागृहात झालेल्या बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. ज्येष्ठ नेते विश्वासराव गडाख, उद्योजक शिवालाल बाफणा, मुळा बँकेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब निमसे, 'मुळा' चे संचालक बाळासाहेब बनकर, सरपंच धनंजय वाघ, विठ्ठल महाराज खाडे व विविध मंडळांचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक भाषणात पांडुरंग अनारसे यांनी शनिवार (ता.१४) रोजी यशवंत सामाजिक प्रतिष्ठानतर्फे होत असलेल्या कृतज्ञता पुरस्कार वितरणाची माहिती देऊन मोरयाचिंचोरे येथील पोहीचा महादेव मंदिरात आयोजित महाशिवरात्र सोहळ्याची माहिती दिली. अरुण घावटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

माजी मंत्री गडाख यांनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत पाटील गडाख यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला उपक्रम मोठ्या उंचीवर गेल्याचे सांगून हाती घेतलेला उपक्रम सर्वांनी आपला समजून उपस्थित राहण्याचे आवाहन केले. प्रतिष्ठानचे सदस्य विनायक दरंदले यांनी आभार मानले.

चहाच्या गोडीला उजाळा

भाषणात गडाख यांनी चहाच्या टपरीवर बसून रोज होणाऱ्या ''चाय पे चर्चा'' ची आठवण सांगताना त्यावेळी जोडलेला स्नेहभाव आजही ऊर्जा देत असल्याचे सांगितले. राजकीय चढ-उतार आणि संघर्षाला स्पर्श करीत त्यांनी सर्वसामान्यांसाठी कायम लढा राहील, असा विश्वास दिला. कार्यक्रम झाल्यानंतर त्यांनी चहाच्या टपरीवर कार्यकर्त्यांसह चहाचा आस्वाद घेतला.

कोळगावात गॅस टाकीचा स्फोट

घराचे पत्रे उडाले, पती-पत्नी गंभीर जखमी

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीगोंदा : तालुक्यातील कोळगाव येथील वेठेकरवाडी (जुनी वाडी) परिसरात शुक्रवारी संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट झाला. या भीषण घटनेत घराची भिंत कोसळली असून घरावरील पत्रे हवेत उडाले आहेत. या भीषण अपघातात संजय रतन वेठेकर आणि सिंधुबाई वेठेकर हे पती-पत्नी गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, संध्याकाळी साडेसातच्या सुमारास वेठेकर यांच्या घरात स्फोट झाला. हा स्फोट इतका जबरदस्त होता की, संपूर्ण परिसर आवाजाने हादरून गेला. स्फोटाच्या तीव्रतेमुळे घराची भिंत कोसळली आणि छताचे पत्रे हवेत फेकले गेले. स्फोटाचा आवाज ऐकताच परिसरातील नागरिक मदतीसाठी धावून आले. गॅस टाकीच्या स्फोटामुळे लागलेल्या आगीत वेठेकर पतीपत्नी गंभीर जखमी झाले. जखमी दाम्पत्याला परिसरातील नागरिकांनी अहिल्यानगर येथील रुग्णालयात हलविण्यात आले असून, तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. स्वयंपाक सिलेंडरच्या साठ्याकडे पुरवठा विभागाचे दुर्लक्ष शेजारील कर्जत तालुक्यात काही दिवसांपूर्वीच सिलेंडर स्फोटाने हाहाःकार उडविला होता. तरीही श्रीगोंदा प्रशासनाने कुंभकर्णी झोप का सोडली नाही? एखादी मोठी दुर्घटना घडल्याशिवाय इथले अधिकारी कारवाई करणार आहेत का काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

संजीवनीच्या बँडची साईपालखीस मानवंदना

शिर्डी परिक्रमेत विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : शिर्डी येथे पार पडलेल्या साई परिक्रमेत देशपातळीवर प्रथम क्रमांक पटकावलेल्या संजीवनी सैनिकी स्कूल व ज्युनिअर कॉलेज, कोपरगावच्या शालेय बँड पथकाने साईबाबांच्या पालखीसमोर बँड संचलन सादर करत मानवंदना दिली. शिस्तबद्ध पावले, भक्तिरसात न्हालेली धून आणि देशभक्तीची ऊर्जा यामुळे उपस्थित भाविक व शिर्डीवासीय मंत्रमुग्ध झाले. अध्यात्म आणि शिस्त यांचा सुरेख संगम या संचलनातून अनुभवायला मिळाला. यावेळी शिर्डीतील अनेक ग्रामस्थांनी संजीवनी सैनिकी स्कूलच्या विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. साईबाबा यांच्या जीवनकाळात सुरू झालेली आणि आजही अखंड श्रद्धेने जपली जाणारी शिर्डी परिक्रमा २०२६ साली भक्तिभावाच्या वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडली.

साईबाबा संस्थान शिर्डी, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविकांच्या वतीने दरवर्षी नियमितपणे आयोजित होणाऱ्या या परिक्रमेमध्ये यंदा सुमारे तीन ते साडेतीन लाख भाविकांनी सहभाग नोंदवला. सुमारे ५ ते ७ किलोमीटर अंतराची व ५ ते ७ तास चालणारी ही परिक्रमा श्रद्धा, कृतज्ञता व मन:शांतीसाठी केली जाते.

सुमित कोल्हे यांचे मनोगत

''आमचा शालेय बँड राष्ट्रीय स्पर्धेसाठी रवाना होण्याच्या आदल्या दिवशीच साईबाबांच्या आशीर्वादाने शिर्डी परिक्रमेत सहभागी होण्याचे निमंत्रण संस्थानकडून आले होते. तोच आशीर्वाद आमच्यासोबत असल्यामुळे आम्हाला राष्ट्रीय स्तरावर विजय मिळाला. मेहनत, जिद्द, चिकाटी व परिश्रम यांसोबत परमेश्वराचा आशीर्वाद तितकाच महत्त्वाचा असतो. त्या ऋणात राहण्यासाठी आज आम्ही साईबाबांच्या सेवेत उपस्थित राहिलो.''

माका येथे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

जनता आवाज वृत्तसेवा

सोनई : नेवासा तालुक्यातील माका येथील राजर्षी शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयतील इ.१० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिल्याबाई होळकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय देडगाव येथील पर्यवेक्षक रावसाहेब राशिनकर यांनी भुषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून देडगाव विद्यालयाचे प्राचार्य श्री स्वरूपचंद गायकवाड हे होते. विद्यालयाचे प्राचार्य जालिंदर शेटे यांनी प्रस्ताविक केले. तर दत्ता तोडमल यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वय १६ वर्ष पाहता परीक्षेला खचून न जाता संत ज्ञानेश्वर श्री छत्रपती शिवाजी महाराज यांनी याच वयामध्ये क्रांती केलेली आहे. सूत्रसंचालन वाघ यांनी केले तर गोविंद खामकर सर यांनी आभार मानले. कार्यक्रम संपल्यानंतर इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले.

बाल आनंद मेळाव्यात हजारोंची उलाढाल

१३० स्टॉल्समधून विद्यार्थ्यांनी साकारला 'आनंद बाजार'

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : शालेय विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे तर व्यवहारज्ञानाचीही ओळख व्हावी, गणिती क्रिया प्रत्यक्ष आयुष्यात कशा वापरायच्या हे शिकता यावे आणि भविष्यात सक्षम, आत्मविश्वासी नागरिक घडावेत, या उद्देशाने शहरातील एकलव्य शिक्षण संस्था संचलित पाथर्डीच्या एम. एम. निऱ्हाळी विद्यालय येथे भव्य बाल आनंद मेळावा व आनंद बाजार उत्साहात पार पडला. या मेळाव्यात तब्बल १३० स्टॉल्स उभारण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या खाद्यपदार्थ व वस्तूंची विक्री करून हजारोंची उलाढाल करत 'शिका आणि कमवा' चा प्रत्यक्ष अनुभव घेतला. विद्यालयाच्या परिसरात भरलेल्या या आनंद बाजारने जणू एखाद्या ग्रामीण जत्रेचे स्वरूप धारण केले होते. रंगीबेरंगी सजावट, विद्यार्थ्यांची शेफ वेशभूषा, आकर्षक पाट्या आणि आमचा पदार्थ चाखा म्हणत ग्राहकांना दिलेला आग्रह यामुळे वातावरण उत्साहाने फुलून गेले होते. या मेळाव्यातील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे विद्यार्थ्यांनी स्टॉलची मांडणी, भांडवल उभारणी, खरेदी-विक्री व्यवहार, सुट्टे पैसे देणे-घेणे, नफा-तोटा मोजणे अशा सर्व गणिती व व्यावहारिक बाबी स्वतः हाताळल्या. ग्राहक देवो भव या संकल्पनेनुसार प्रत्येक ग्राहकाचे हसतमुखाने स्वागत करण्यात येत होते.

पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. मेळाव्याचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष कांतीलाल गुगळे यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्या प्रभावती ढाकणे, गटशिक्षणाधिकारी रामनाथ कराड, विश्वस्त श्रीकांत निऱ्हाळी, समन्वयक बाळकृष्ण जोशी, नगरसेवक देवा पवार, नगरसेविका सविता भापकर, सुरेखा हंडाळ, माणिक पालवे, संजय दहिफळे तसेच विद्यालयाचे प्राचार्य संजय घिगे आदी मान्यवर उपस्थित होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी संतोष लोहाडे, गणेश कुदळ, विठ्ठल वारकड, गिरीश जोर्वेकर, गणेश खेडकर, राजेंद्र राठोड, रामनाथ चौधरी आदींनी परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांना मिळते व्यव्हारी ज्ञान

अशा आनंद बाजारातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास नेतृत्वगुण आणि व्यवहार कुशलता विकसित होते. यातून विद्यार्थ्यांना या जगात कशा पद्धतीने व्यवहार केले जाऊन कशाद्वारे व्यवहारी चालना मिळाली जाते. हा अनुभव आशा क्रमातून विद्यार्थ्यांना कळण्यास मदत होणार असल्याचा विश्वास माजी जिल्हा परिषद सदस्य प्रभावती ढाकणे यांनी व्यक्त केला.

आई-वडिलांच्या सेवेबरोबर निस्वार्थ भक्तीभाव जपा

श्रीराम महाराज चोपडे; काळेश्वर येथे सप्ताह

जनता आवाज वृत्तसेवा

भातकुडगाव फाटा : भोलेनाथाच्या दरबारात सुख व समाधान प्राप्त करायचे असेल तर संतांचा विचार व आई-वडिलांची सेवा करून निस्वार्थ भक्ती करून जीवनाचे सार्थक करून घेता येईल.संतांनी घालून दिलेल्या मार्गाने मार्गक्रमण करणे गरजेचे आहे. धनाने मोठे होता येईल मात्र सुख शांती मिळण्यासाठी देवालयातच यावे लागेल, असे स्पष्ट मत श्रीराम महाराज चोपडे यांनी मांडले.

शेवगाव तालुक्यातील गुंफा येथील स्वयंभू काळेश्वर देवस्थानच्या प्रांगणात आयोजित महाशिवरात्री महोत्सवात किर्तन रूपी पाचवे पुष्प गुंफताना चोपडे महाराज बोलत होते. सालाबाद प्रमाणे चालू असलेला महाशिवरात्री उत्सवानिमित्त श्री क्षेत्र देवगड दत्तपीठ संस्थांचे महंत शांतीब्रह्म भास्करगिरी महाराज यांच्या आशीर्वादाने व रामायणाचार्य प्रभाकर महाराज कावले, लहानु महाराज कराळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या सप्ताहात महाराज बोलत होते. संतांनी सर्वासाठीच ग्रंथ रूपाने संदेश देऊन ठेवला आहे की, देवावरती श्रद्धा ठेवा मात्र त्यामध्ये अंधश्रद्धा असू नये.

श्रद्धेला फळ मिळतेच, त्यासाठी श्रद्धेला खूप महत्त्व आहे, असे विचार यावेळी त्यांनी मांडले. यावेळी गणेश महाराज, आदिनाथ महाराज ढोले, लहानु महाराज कराळे, भातकुडगावचे माजी सरपंच शंकरराव नारळकर, बाळासाहेब काळे, आर.आर. माने, दत्तात्रय गोसावी,संजय आहेर, डॉ. श्याम काळे, कैलास काळे, अशोक दुकळे, शेषराव काळे, नितीन खंडागळे, अशोक हंडाळ, भास्कर चोपडे, हनुमान आठरे, नवनाथ आठरे उपस्थित होत्या.

डॉ. साळुंखे हे समाजभान जागृत करणारे साहित्यिक

माजी मंत्री बाळासाहेब थोरात; सातारा येथे थोरातांनी घेतली डॉ. आ. ह. साळुंखेंची भेट

जनता आवाज वृत्तसेवा
संगमनेर : विचारांप्रती निष्ठा जपणारे आणि समाजापर्यंत सत्य पोहोचावे, यासाठी आयुष्यभर लेखणी झिजवणारे डॉ. साळुंखे हे थोर साहित्यिक आहेत. आजही ते आपल्या लेखनातून समाजभान जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. त्यांनी लिहिलेले विद्रोही तुकाराम हे पुस्तक प्रत्येकाने आवर्जून वाचण्यासारखे असल्याचे मत माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले.

माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सातारा येथे ज्येष्ठ विचारवंत व लेखक डॉ. आ. ह. साळुंखे यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी त्यांच्या तब्येतीची चौकशी करून राज्यातील राजकारण, साहित्य, समाजकारण व संस्कृती अशा विविध विषयांवर चर्चा केली.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, रूढी परंपरांच्या विरोधात तुकाराम महाराजांनी आवाज उठवला. संत आणि समाज सुधारक यांचा सुंदर मिलाप या पुस्तकातून डॉ साळुंखे यांनी मांडला आहे. महाराष्ट्राच्या एकात्मतेचा पुरोगामी विचार पुढे नेण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे.

यावेळी चोखिया आणि बळीवंश ही पुस्तके त्यांनी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांना भेट दिली. याप्रसंगी संत चोखामेळा यांच्या जीवनकार्यावर दोघांमध्ये सखोल चर्चा झाली. संत चोखामेळा यांच्या कुटुंबात पाच संत होते. चोखामेळा, पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, बहीण निर्मळा आणि मेहुणे बंका. हे सर्वजण अभंग रचनाकार व विठ्ठल भक्त होते. त्यांच्या कुटुंबीयांनी तत्कालीन व्यवस्थेविरुद्ध संघर्ष केला. त्यांना मंदिर प्रवेश नाकारला गेला, मात्र त्यांच्या विचारांना आणि शब्दांना कोणीही थांबवू शकले नाही. त्यांच्या अभंगांमधून आणि लेखणीतून तत्कालीन समाजव्यवस्थेतील उणिवा जगासमोर आल्या.

थोरात साहित्यिकांच्या पाठीशी उभे

बाळासाहेब थोरात यांची साहित्याविषयीची ओढ, साहित्य क्षेत्राशी असलेला स्नेह आणि विचारांसाठी जगणाऱ्या साहित्यिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची त्यांची भूमिका सर्वश्रुत आहे. नाशिक येथे झालेल्या साहित्य संमेलनातील त्यांचे भाषण आणि साहित्य क्षेत्राला स्वातंत्र्य व स्वाभिमानाची त्यांनी करून दिलेली जाणीव आजही अनेकांच्या स्मरणात आहे.

गोपाळ संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची निवड

जनता आवाज वृत्तसेवा
टाकळीभान : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे अखिल भारतीय श्रीकृष्ण गोपाळ समाज संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी गावातील साईबाबा मंदिर येथे बैठकीमध्ये नुकत्याच पार पडल्या.

यामध्ये टाकळीभान गोपाळ संघटनेच्या अध्यक्षपदी शहादेव ब्राह्मणे, उपाध्यक्षपदी बाळासाहेब सावंत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच तालुकाध्यक्षपदी विठ्ठल जाधव, जिल्हा क्रीडा अध्यक्षपदी पंकज जाधव यांची निवड झाली.

याप्रसंगी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार समस्त गोपाळ संघटना तसेच ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला व निवडीबद्दल नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी गोपाळ समाज बांधवांच्या हितासाठी काम करण्याचे आवाहन नूतन पदाधिकाऱ्यांनी केले.

भाऊसाहेब गव्हाणे, सुभाष ब्राह्मणे, एकनाथ सावंत, संजय सावंत, कानिफनाथ जाधव, अनिल लोणारे, विशाल ब्राह्मणे, रोहन लोणारे, किरण ब्राह्मणे, गणेश सावंत, राजू सावंत, एकनाथ पवार, बाबासाहेब सावंत, दादासाहेब सावंत, आकाश लोणारे, दीपक सावंत, शिवनाथ पवार यासह आदी उपस्थित होते.

कर्मचाऱ्यांनी स्पर्धेत गाजवले यश

अकोले पं. स.च्या कर्मचाऱ्यांची नेत्रदीपक कामगिरी

जनता आवाज वृत्तसेवा
अकोले : जिल्हा परिषद अहिल्यानगर अधिकारी व कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२६ मध्ये पंचायत समिती अकोलेच्या कर्मचाऱ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारात उत्तुंग यश मिळविले.

अहिल्यानगर येथे माऊली सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित कार्यक्रमात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ व उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांच्या प्रमुख उपस्थित व मार्गदर्शनाखाली या स्पर्धा संपन्न झाल्या. पंचायत समिती अकोलेच्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून विविध क्रीडा प्रकारांत पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी केली.

जिल्हास्तरीय स्पर्धेतील हॉलीबॉल, बास्केट बॉल, टेबल टेनिस, कॅरम एकेरी, कॅरम दुहेरी, बॅडमिंटन, थाळीफेक, ४०० मीटर धावणे, भालाफेक अशा विविध क्रीडा प्रकारात अकोलेच्या स्पर्धकांनी यश संपादन केले.

तसेच जिल्हास्तरीय स्पर्धे तील विजेते हॉलीबॉल संघात रवींद्र सोनवणे, सुरज चव्हाण, शेलार सर, बांबळे भाऊसाहेब, लोहकरे भारत, संतोष देशमुख या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्यात अंतिम विजेता संघ ठरला.

सर्व यशस्वी स्पर्धकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अकोलेचे गटविकास अधिकारी अमर माने, कृ. वि.अधिकारी विकास चौरे आदींनी कौतुक केले.

पुतण्याकडून चुलत्याचा खून

फक्राबादमध्ये तीन जणांविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल

जनता आवाज वृत्तसेवा
जामखेड : भावाने मुलगी पळवून नेल्याच्या रागातून पुतण्याने चुलते तुकाराम सुर्यभान काळे (वय ५०, रा. फक्राबाद) यांचा चाकूने खून केला. ही धक्कादायक घटना तालुक्यातील फक्राबाद परिसरात दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता घडली.

फिर्यादी राहुल तुकाराम काळे (वय २५, धंदा - मजुरी, रा. फक्राबाद) यांनी सांगितले की, दि. १२ फेब्रुवारी रोजी आरोपी सागर एकनाथ काळे, वैभव एकनाथ काळे व तुळसाबाई एकनाथ काळे यांनी त्यांच्याकडे येऊन विचारले की, कमल बाळू पिंपळे यांची मुलगी आमचा भाऊ ज्ञानेश्वर एकनाथ काळे यांनी पळवून का नेली? असे म्हणत शिवीगाळ आणि धमकी दिली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी आरोपींनी मयत तुकाराम काळे यांना झोपडपट्टी येथे काठीने मारहाण करून चाकूने भोकसले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना तातडीने जामखेड येथील रुग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची नोंद केली.

या प्रकरणी राहुल काळे यांच्या फिर्यादीवरून जामखेड पोलीस स्टेशनमध्ये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, एक आरोपी वैभव एकनाथ काळे यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

या घटनेचा पुढील तपास जामखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी हे करीत आहेत.

यशासाठी कष्ट आणि परिश्रम आवश्यक : न्या. कसबे

डावखर कन्या विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

जनता आवाज वृत्तसेवा
श्रीरामपूर : जीवनात यश मिळवायचे असेल तर कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. यश हे सहजासहजी मिळत नाही, त्यासाठी परिश्रमांची जोड आवश्यक असते, असे प्रतिपादन सत्र व दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश व्ही. एस. कसबे यांनी केले.

महाराष्ट्र सेवा मंडळ संचलित शं. स. डावखर कन्या विद्यालयात दहावीच्या विद्यार्थिनींच्या निरोप समारंभ कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या.

यावेळी त्यांनी विद्यार्थिनींना पुढील वाटचालीस शुभेच्छा देतानाच, समाजात वावरताना कोणती काळजी घ्यावी आणि स्वतःचे रक्षण कसे करावे, याविषयी बहुमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मंडळाचे जेष्ठ विश्वस्त नारायणराव डावखर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. मुमताज शेख यांनी विद्यार्थिनींना 'पोक्सो' कायद्यांतर्गत असलेल्या विविध तरतुदींची सखोल माहिती दिली, ज्यामुळे विद्यार्थिनींमध्ये त्यांच्या हक्क आणि सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण झाली.

या सोहळ्यासाठी मुख्याध्यापिका सुवर्णमाला बोधक, पटेल हायस्कूलचे मुख्याध्यापक दिलीप शेवाळे, नगरपालिका शाळा क्र. २ चे मुख्याध्यापक सचिन शिंदे तसेच दानशूर व्यक्तिमत्व संतोष कासलीवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री औटी यांनी केले. तर आभार म्हसूजी गांगुर्डे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका बोधक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

लव-जिहाद व धर्मांतराविरोधात कायदा करण्याची मागणी

जनता आवाज वृत्तसेवा
राहुरी : लव-जिहाद, फसवणूक व बलपूर्वक धर्मांतर रोखण्यासाठी कायदा करण्याबाबत शासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय होत नसल्याच्या निषेधार्थ सकल हिंदू समाज, राहुरी तालुका यांच्या वतीने तहसीलदार डॉ. अमित पवार निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने १४ फेब्रुवारी २०२५ रोजी विशेष समिती स्थापन करण्याचा शासन निर्णय घेतला असतानाही एक वर्षाहून अधिक कालावधी उलटूनही कोणताही अहवाल, शिफारस किंवा कायदेशीर निर्णय झालेला नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर, शासन निर्णय केवळ कागदावरच राहू नये आणि तातडीने अंमलबजावणी व्हावी, या प्रतीकात्मक मागणीसाठी निवेदकांनी तहसीलदार डॉ. अमित पवार यांना संबंधित शासन निर्णयाची फ्रेम भेट दिली. येत्या महाराष्ट्र विधिमंडळ अधिवेशनात लव-जिहाद व बलपूर्वक धर्मांतर रोखण्यासाठी स्वतंत्र कायदा मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी तहसीलदारांना निवेदन देतांना महिलांसह पुरुषांची उपस्थिती होती.

आश्वी 'जैनम जयति शासनम'च्या जयघोषाने दुमदुमली

आचार्य मुनीचंद्रसुरीश्वरजी महाराज यांच्यासह ७० संतांचे भव्य स्वागत

जनता आवाज वृत्तसेवा
संगमनेर : संगमनेर तालुक्यातील आश्वी येथे चतुर्विध संघाच्या उपस्थितीत जैन संत आचार्य प. पूज्य मुनीचंद्रसुरीश्वरजी महाराज यांच्यासह ७० साधू-साध्वीजी आणि प. पूज्य चंदन बालाजी महाराज व पद्मावतीजी महाराज (ठाणा ७) यांचे अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी संपूर्ण आश्वी शहर 'जैनम जयति शासनम'च्या जयघोषाने दुमदुमून गेले होते.

जैन संतांचे आगमन सर्वप्रथम मांची हिल, आश्वी येथील 'उज्ज्वल गोरक्षण केंद्रात' झाले. यावेळी संतांनी गोमातेचे दर्शन घेऊन केंद्राच्या कार्याची पाहणी केली. अहिंसा आणि जीवदयेचा संदेश देणाऱ्या जैन धर्मात गोसेवेला अनन्यसाधारण महत्त्व असल्याने, संतांच्या या भेटीने गोशाळा परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

आश्वीतील जैन श्रावक आणि श्राविका मोठ्या संख्येने आचार्य श्रींच्या स्वागतासाठी सामोरे गेले. गावातून संतांची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीच्या स्वागतासाठी गावातील मुख्य रस्त्यांवर आकर्षक सडा-रांगोळी काढण्यात आली होती.

मिरवणुकीच्या अग्रभागी पारंपारिक बँड पथक आणि संबळ वाद्य होते. त्यामागे मंगल कलश घेतलेल्या महिला, जैन ध्वज घेतलेले युवक-युवती आणि पांढऱ्या शुभ्र वस्त्रात उपस्थित असलेले श्रावक सहभागी झाले होते. ही मिरवणूक उंबरी रोडने मार्गक्रमण करत गावातील जैन धर्म स्थानकात आली.

या सोहळ्यासाठी राहुरी येथील डॉ. सुवर्णा गोलेच्चा, सुभाष सावज, बाळासाहेब लोढा, महावीर शिंगी, धिरज भंडारी यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

या ऐतिहासिक सोहळ्याचे नियोजन श्रावक संघाचे अध्यक्ष सुम्मतीलाल गांधी, सुशील भंडारी, प्रवरा बँकेचे संचालक संजय गांधी, योगेश रातडीया, किशोर पटवा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या मंगलप्रसंगी आश्वी व परिसरातील जैन धर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. संतांच्या दर्शनासाठी ग्रामस्थांनीही मोठी गर्दी केली होती.

भूषण भंडारी, अथर्व रातडीया, सौरभ भंडारी, संयम लुंकड, युग लुंकड, अनिकेत पटवा, शुभम बोरा, श्रेणीक बोरा, शुभम पटवा, ईश्वर भंडारी, रोहित भंडारी, अभिजीत गांधी, निलेश चोपडा, मिलिंद बोरा, निलेश रातडीया, पंकज नाके, राजेंद्र लुणीया, योगेश लुकंड, सागर रातडीया, विलास भंडारी, प्रशांत गांधी, प्रीतम गांधी, संदीप बोरा, नितीन गांधी, अमित भंडारी, रवींद्र बिहाणी, सतिष गांधी, आश्वीन मुथ्था, समीर गांधी, मनोज पटवा, दिपक बोरा, गौतम रातडीया, रतीलाल रातडीया, अविनाश गांधी व श्रावक संघाच्या सर्व सदस्यांनी संतांचे स्वागत केले.

शिंगवे दत्ताचे येथे आज विविध धार्मिक कार्यक्रम

जनता आवाज वृत्तसेवा
पाथर्डी : नेवासा, पाथर्डी, अहिल्यानगर या तीन तालुक्याच्या सीमेवर असलेल्या शिंगवे येथील स्वयंभू श्रीदत्त देवस्थान येथे आज, महाशिवरात्री निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वयंभू आणि जागृत देवस्थान म्हणून येथील देवस्थानाची महाराष्ट्रात ख्याती आहे. सध्या या देवस्थानाच्या जीर्णोद्धाराचे काम प्रगतीपथावर असून आज, रविवारी होणाऱ्या महाशिवरात्री निमित्ताने श्रीदत्त देवस्थान येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

आज पहाटे पाच ते सहा काकडा आरती, सकाळी सहा वाजता महाआरती सोहळा, सकाळी अकरा वाजता भाविकांच्यावतीने व देवस्थान समितीच्यावतीने महाअभिषेक सोहळा, दुपारी साडेबारा व सायंकाळी आठ वाजता महाशिवरात्री निमित्तान भाविकांसाठी फराळाची व्यवस्था होणार असून, दुपारी बारा वाजता व सायंकाळी साडेसात वाजता श्रीदत्तप्रभू व भगवान श्रीमहादेवाची महाआरती होणार आहे.

रात्री दहा वाजता लघु रुद्राभिषेक सोहळ्याला सुरुवात होणार असून हा अभिषेक सोहळा रात्री एक वाजेपर्यंत चालणार आहे. रात्री एक वाजता दत्तप्रभूच्या व भगवान श्रीमहादेवाच्या महाआरतीने या सोहळ्याची सांगता होणार आहे. या सोहळ्याची संपूर्ण तयारी होत आली असून सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन श्रीदत्त देवस्थानचे अध्यक्ष सिताराम गाडेकर यांच्यासह मंदिर प्रशासन समिती व शिंगवे ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

थकीत वेतन देण्याचे आश्वासनांतर उपोषण मागे

आ. खताळ यांच्या प्रयत्नांना यश; २२ टोल कर्मचाऱ्यांना पुन्हा नोकरी

जनता आवाज वृत्तसेवा
संगमनेर : तालुक्यातील हिवरगाव पावसा टोल नाका येथे काम करणाऱ्या २२ कर्मचाऱ्यांना अचानक कामावरून कमी केल्यानंतर सुरू झालेल्या साखळी उपोषणाला अखेर यश आले आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत कमी करण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच थकीत वेतन अदा करण्याचेही आश्वासन देण्यात आले. गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेले टोल कर्मचाऱ्यांचे साखळी उपोषण आ. अमोल खताळ यांच्या हस्ते नारळपाणी देऊन मागे घेण्यात आले.

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील हिवरगाव पावसा टोल नाक्यावर अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना नव्याने आलेल्या जे. आर. रोडवेज कंपनीचे मालक राजपाल यांनी अचानक कामावरून कमी केले होते. काही कर्मचाऱ्यांच्या पगारात कपातही करण्यात आली होती. या निर्णयाच्या निषेधार्थ संतप्त कर्मचाऱ्यांनी साखळी उपोषण सुरू केले होते.

यानंतर शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीस राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचे प्रोजेक्ट मॅनेजर पी. डी. कदम, टोल प्लाझा कंपनीचे मॅनेजर अनुप शिंदे, शिवसेना तालुका प्रमुख रामभाऊ राहाणे, भाजप तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, शिवसेनेचे श्याम राहाणे, भाजपचे महेश मांडेकर तसेच टोल प्लाझा वेल्फेअर असोसिएशनचे कार्याध्यक्ष विलास राहाणे उपस्थित होते.

आ. खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या चर्चेत कामावरून कमी करण्यात आलेल्या सर्व २२ कर्मचाऱ्यांना तत्काळ पुन्हा कामावर घेण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय, सर्व टोल कर्मचाऱ्यांच्या पगारातील कपात रद्द करून पगार पूर्ववत करण्याचे आश्वासन देण्यात आले. गेल्या तीन वर्षांपासून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातील तफावत लक्षात घेऊन प्रीती बिल्डर कंपनीचे मालक पुढील आठवड्यात आल्यानंतर वेतनवाढ व पीएफ संदर्भात चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, असेही सांगण्यात आले.

तसेच १४ कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन विधी कन्स्ट्रक्शन कंपनीच्या मालकाशी चर्चा करून पुढील आठवड्यात देण्याबाबत सूचना करण्यात येतील, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, या आंदोलनात हरिभाऊ राहाणे, सोपान दुधवडे, पांडुरंग काळे, रामदास दुधवडे, खंडू काळे, रवींद्र काळे, रवींद्र मेंगाळ, नवनाथ दुधवडे, सागर दुधवडे, सचिन काळे, दीपक दुधवडे, राहुल मधे, विनीत दुधवडे, सुनील काळे, बाळासाहेब काळे यांच्यासह सर्व टोल कर्मचारी सहभागी झाले होते.

रिक्षा चालकांमुळे 'चैन स्नॅचर' महिला जाळ्यात

वृद्धेचे गंठण वाचले; ऑटो रिक्षा संघटनेचे कौतुक

जनता आवाज वृत्तसेवा
नेवासा : बसमध्ये चढताना एका वृद्ध महिलेचे सोन्याचे गंठण कापून पळ काढणाऱ्या संशयित महिलेला नेवासा तालुका ऑटो रिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि चालकांनी शिताफीने पकडले. रिक्षा चालकांच्या या सतर्कतेमुळे वृद्ध महिलेचे दागिने सुरक्षित हस्तगत करण्यात यश आले असून संशयित महिलेला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



नेवासा बसस्थानक परिसरात बसमध्ये चढत असताना एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण कापले गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. दागिने चोरीला गेल्याने वृद्ध महिला अत्यंत घाबरली होती. त्यांनी तात्काळ तेथे उपस्थित असलेल्या रिक्षा चालकांकडे धाव घेत मदतीची विनंती केली.

घटनेचे गांभीर्य ओळखून रिक्षा संघटनेचे अध्यक्ष भरत वालतुरे, सचिव योगेश काळे, उपाध्यक्ष गंगाराम नवसे व सदस्यांनी क्षणाचाही विलंब न लावता परिसरात संशयित व्यक्तींचा शोध सुरू केला. संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या एका महिलेला थांबवून तिची चौकशी केली असता, तिने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, रिक्षा चालकांनी अधिक तपासणी केली असता, संबंधित महिलेच्या पिशवीतून कापलेले सोनेरी गंठण मिळून आले.

रिक्षा चालकांनी ते दागिने पीडित महिलेला परत केले आणि संशयित महिलेला पुढील कारवाईसाठी नेवासा पोलिसांच्या स्वाधीन केले. नागरिकांकडून रिक्षा चालकांचे विशेष कौतुक होत आहे.

रस्ता होण्याचे स्वप्न अधुरेच राहिले : माजी मंत्री तनपुरे

६७ लाख रुपयांच्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

जनता आवाज वृत्तसेवा

राहुरी : मी आमदार असताना या रस्त्याच्या प्रश्नाकडे लक्ष दिले होते. जिल्हा नियोजन समितीत हा विषय झाला होता. मात्र नंतर काही अदृश्य शक्तींमुळे प्रशासकाच्या राजवटीमध्ये हा रस्ता होण्याचे स्वप्न तसेच राहिले. असे प्रतिपादन माजीमंत्री प्राजक्त तनपुरे केले.

राहुरी शहरातील पाण्याची टाकी ते संत महिपती महाराज चौक या ६७ लाख रुपयांच्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ दि. १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळेस ते बोलत होते. ते पूढे म्हणाले कि, आता राहुरी नगरपालिकेवर नूतन नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे येताच स्टैंडिंग कमिटीची मीटिंग होत मंजुरी होऊन टेंडर प्रक्रिया व अन्य बाबी पूर्ण करत वर्क ऑर्डर मिळाली. यात आमच्या मार्गदर्शिका, जिल्हा नियोजन समितीच्या माजी सदस्या उषाताई तनपुरे, राहुरी नगरपालिकेचे गटनेते हर्ष तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्मिता भुजाडी, अविनाश मस्के, प्रदीप भूजाडी व अन्य नगरसेवकांच्या माध्यमातून या कामात लक्ष दिल्याने या रस्त्याच्या डांबरीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. शहरातील पाण्याच्या टाकी ते महिपती महाराज चौक या रस्त्याचा अनेक वर्षांपासून गंभीर प्रश्न होता. न्यायालयीन कामकाज, ग्रामीण भागातील जनता व शहरातील उप नगरीय नागरिक या मार्गाचा वापर करत असल्याने हा प्रश्न गंभीर बनला होता. हा रस्ता लवकरच होत असल्याने शहरवासीय व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

प्रसंगी नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, माजी उप नगराध्यक्ष सुर्यकांत भूजाडी, नगरसेवक अविनाश म्हस्के, उत्तम सातपूते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी उप नगराध्यक्ष गजानन सातभाई, गटनेते हर्ष तनपुरे, नगरसेविका उषाताई तनपुरे, स्मिता भुजाडी, आस्मा शेख, लता जगधने, वृषाली तनपुरे, प्रियंका आहेर, नगरसेवक सागर तनपुरे, सोन्याबापु जगधने, प्रशांत डौले, प्रतिक तनपुरे, प्रदिप भुजाडी, राहुल शेटे, डॉ. संतोष उदावंत आदिंसह असंख्य लोक उपस्थित होते.

बनावट देशी दारूचा कारखाना उद्ध्वस्त

२१ लाखांच्या मुद्देमालासह चौघांना बेड्या!

जनता आवाज वृत्तसेवा

नाशिक : जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात सुरू असलेला बनावट देशी दारूचा अड्डा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विशेष पथकाने सोमवारी (ता. ९) धडक छापा टाकून उद्ध्वस्त केला. या कारवाईत सुमारे २१ लाख ८१ हजार ५३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, चार संशयितांना अटक करण्यात आली आहे. परप्रांतीय नागरिकांकडून हा अवैध व्यवसाय चालविला जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे जिल्हा अधीक्षक संतोष झगडे यांना नांदूरशिंगोटे परिसरात बनावट देशी दारू निर्मिती व साठा सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार उपअधीक्षक अ. सु. तांबारे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने सोमवारी छापा टाकला. कारवाईदरम्यान ११२.६८ लिटर बनावट देशी दारू, १,९९१.५५ लिटर देशी दारू तसेच एमएच १७ डीजे ५५३८ क्रमांकाची क्रेटा चारचाकी कार असा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अटक करण्यात आलेल्या संशयितांमध्ये वेणुगोपाल सिद्धय्या चेकिल्ला (वय ४६, रा. गणेशनगर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर; मूळ रा. तेलंगणा), नरेश लिंगागौड जेल्ला (२९, रा. नांदूरशिंगोटे, ता. सिन्नर; मूळ रा. मेदक, तेलंगणा), हरीश गंगागौड बबांतुला (३०) आणि नरेंद्रभौड तिरुपतीगौड सुरमपल्ली (३२, दोघे सध्या रा. नांदूरशिंगोटे, ता. सिन्नर; मूळ रा. कामारेड्डी, तेलंगणा) यांचा समावेश आहे.

ही कारवाई उपअधीक्षक तांबारे, निरीक्षक शैलेंद्र मराठे, दुय्यम निरीक्षक डी. बी. कोळपे, राहुल जाडकर, एस. एस. भगत, विष्णू सानप, सोनाली चंद्रमोरे, संतोष कडलग, दुर्गादास बाविस्कर, अमित गांगुर्डे, राकेश पगारे व हर्षल नांद्रे यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

दरम्यान, सीमावर्ती भागात अवैध दारू निर्मिती व विक्री रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून पुढील काळात अधिक कडक कारवाई केली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसायाला मोठा धक्का बसला असून, परिसरात खळबळ उडाली आहे.

३५० अतिक्रमणधारकांना नोटिसा

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : पालिका प्रशासनाने शहरात अतिक्रमण मोहीम राबविल्यानंतर बेलापूर रोड, संगमनेर रोड तसेच नेवासा रोड परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागानेही आपल्या हद्दीतील अतिक्रमण हटविले होते. आता शहरातील पाटबंधारे विभागाच्या हद्दीत झालेले अतिक्रमण काढण्यासाठी पाटबंधारे विभागाने पाऊल उचलले आहे. शहरातील वराह पैदास केंद्र ते सरस्वती कॉलनी परिसरात मेन कॅनॉलच्या कडेच्या सुमारे ३५० अतिक्रमण धारकांना पाटबंधारे विभागाने नोटीसा बजाविल्या आहेत.

मध्यंतरी काही काळ प्रवरा डावा कालवा हद्दीतील थंडावलेली जलसंपदा विभागाच्या अतिक्रमण हटाव मोहिम पाटबंधारे विभागाने पुन्हा हाती घेतली आहे. त्यानुसार ३५० ते ३७५ अतिक्रमणधारकांना पाटबंधारे विभागाकडून नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. मेन कॅनॉलच्या वराहपालन केंद्र ते सरस्वती कॉलनी परिसरापर्यंत ही अतिक्रमण मोहिम राबविण्यात येणार आहे.

काही महिन्यांपूर्वी शहरात अतिक्रमण मोहिम हाती घेऊन अतिक्रमणे काढण्यात आली होती. मात्र त्यानंतर दिवाळी, शारदोत्सव, गणपती उत्सव आल्याने ही अतिक्रमण मोहिम थांबविण्यात आली होती. मात्र, आता पुन्हा वरिष्ठांच्या निर्देशानुसार नोटिस बजावल्यापासून दि. २६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अतिक्रमणधारकांनी आपले अतिक्रमण स्वः तहून काढून घ्यावे, असे नोटिसीत नमूद करण्यात आले आहे. अन्यथा दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी पासून पाटबंधारे विभागामार्फत मोठ्या पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण काढण्यास प्रारंभ होणार आहे.

शहर व शिरसगाव हद्दीत अनधिकृत अकृषीक जागेचा वापर करणाऱ्यांनाही नोटीस

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४५ (२) नूसार ग्राम महसूल अधिकारी, श्रीरामपूर यांच्याकडील दि. २ फेब्रुवारी २०२६ च्या प्राप्त अहवालानुसार श्रीरामपूर शहर व शिरसगाव हद्दीतील अनधिकृत अकृषीक जागेचा वापर करत असलेल्या २९३ जणांना महसूल विभागानेही नोटीसा बजाविल्या आहेत.

पोस्टाचा अपघाती विमा मंजूर

जनता आवाज वृत्तसेवा

कर्जत: कर्जत उपविभागातील कर्जत तालुक्यातील रेहेकुरी शाखा पोस्ट कार्यालयातून नयन राजेंद्र घालमे यांनी आदित्य बिर्ला हेल्थ इन्शुरन्स कंपनीचा अपघाती विमा उतरविला होता. त्यानंतर त्यांचा दुर्दैवी अपघात झाला असून या अपघातात त्यांच्या हाताला फ्रॅक्चर होऊन गंभीर इजा झाली. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

सुदैवाने त्यांनी पोस्ट विभागामार्फत अपघाती विमा काढलेला असल्याने उपचारासाठी त्यांना तब्बल ८५ हजार रुपयांचा अपघाती विमा मंजूर झाला. विशेष म्हणजे ही मंजूर रक्कम त्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करण्यात आली आहे. या मदतीबद्दल घालमे यांनी रेहेकुरी शाखेचे पोस्टमास्तर प्रफुल्ल वाघमारे यांचे मनःपूर्वक आभार मानले. या संपूर्ण प्रक्रियेसाठी कर्जत येथील पोस्ट विभागाचे उपविभागीय अधिकारी तांबे तसेच आदित्य बिर्ला इन्शुरन्स कंपनीचे प्रतिनिधी निलेश ढगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आजच्या धावपळीच्या व असुरक्षित जीवनशैलीमध्ये अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे भारतीय टपाल विभागामार्फत अवघ्या ५४९ रुपयांमध्ये सुरू असलेल्या अपघाती विमा योजनेचा लाभ प्रत्येक नागरिकाने घ्यावा, असे आवाहन यानिमित्ताने करण्यात आले आहे. कमी प्रीमियममध्ये उपलब्ध असलेल्या या योजनेत सहभागी होऊन नागरिकांनी आपल्या जीवनाची सुरक्षितता सुनिश्चित करावी, असेही सांगण्यात आले आहे.

महिलांना सुरक्षित ठेवण्याची सर्वांची जबाबदारी

जनता आवाज वृत्तसेवा

राहाता : लैंगिक छळामुळे निर्माण होणारा मानसिक ताण हा महिलांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरू शकतो. अशा घटनांमुळे चिंता आणि नैराश्य वाढते, ज्यामुळे महिलांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. त्यामुळेच कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित वातावरण देणे आणि त्यांचे संरक्षण करणे ही केवळ कायदेशीरच नाही, तर सामाजिक आणि नैतिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध समाजसेविका ॲड. रंजना गवांदे यांनी केले.

प्रवरा वैद्यकीय अभिमत विद्यापीठातील अंतर्गत तक्रार समितीच्या वतीने कामाच्या ठिकाणी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये लैंगिक छळाचे परिणाम आणि पॉश कायदा या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

याप्रसंगी विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. रवींद्र लावरे, समिती अध्यक्षा डॉ. अनिता मुंढे, डॉ. मोहन पवार, डॉ. वैशाली फाळके, डॉ. तेजस बोरकर, डॉ. सोनाली दास, डॉ. शिवलिला उपासे, नर्सिंग सुपरइंटेंडंट डॉ. संगिता विखे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

पॉश कायद्याचे महत्त्व अधोरेखित करताना ॲड. गवांदे म्हणाल्या की, समाजात नीती-नियमांचे उल्लंघन होऊ लागल्यानेच कठोर कायद्यांची निर्मिती झाली आहे. प्रत्येक संस्थेत सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि समानतेवर आधारित कार्यसंस्कृती निर्माण करणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या कार्यशाळेला प्रवरा अभिमत विद्यापीठातील महिला प्राध्यापिका, परिचारिका, आणि महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस बोरकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सचिव डॉ. हिरा जयशीला यांनी मानले.

महाशिवरात्रीनिमित्त ऐतिहासिक शिवयाग सोहळ्याचे आयोजन

जनता आवाज वृत्तसेवा

कर्जत : सद्गुरू शंकर महाराज मठ यांच्या वतीने केडगाव तर्फे अकोळनेर येथे महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त भारतातील सर्वात भव्य व दिव्य असा २५२५ कुंडात्मक महाशिवयाग सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा ऐतिहासिक सोहळा रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. यासाठी कुठलेही शुल्क आकारण्यात येणार नाही ही सर्व सेवा मोफत आहे.

हा महाशिवयाग श्री सद्गुरू शंकर महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व गुरुवर्य अशोकदादा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत असून, एवढ्या मोठ्या प्रमाणावर कुंडात्मक शिवयाग यापूर्वी कुठेही झालेला नसल्याने हा सोहळा संपूर्ण भारतात लक्षवेधी ठरत आहे. या सोहळ्याची संपूर्ण तयारी या भव्य तीर्थक्षेत्री झाली असून राज्यभरातून हजारो भावी या पवित्र सोन्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

महाशिवरात्रीनिमित्त आयोजित केलेल्या या कार्यक्रमाची रूपरेषा - सकाळी सहा ते आठ - श्रींचा महारुद्र अभिषेक, सकाळी आठ ते बारा भव्य दिव्य महाशिवयाग सोहळा, दुपारी बारा ते एक महादेवांचा पालखी सोहळा, दुपारी एक ते दीड शिवपार्वती विवाह सोहळा, दुपारी दीड ते तीन भजन सेवा, दुपारी दोन ते पाच महाप्रसाद

सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्रींचा महाअभिषेक, भव्य दिव्य महाशिवयाग, महादेवांची पालखी, शिवपार्वती विवाह सोहळा, भजन सेवा व महाप्रसाद अशा भक्तिभावाने ओथंबलेल्या कार्यक्रमांमुळे संपूर्ण

परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमणार आहे.

या यज्ञ सोहळ्याचे आध्यात्मिक महत्त्व अनन्यसाधारण असून, यज्ञ केल्याने नकारात्मक शक्तींचा नाश होतो, जीवनात सकारात्मक ऊर्जा संचारते, संकटे दूर होऊन सुख-समृद्धी व शांती प्राप्त होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. यज्ञात आहुती देणाऱ्या भक्तांना गुरुकृपा व देवाशीर्वाद लाभतो, असेही आयोजकांनी सांगितले.

या महाशिवरात्री महोत्सवातील सर्व सेवा पूर्णतः विनामूल्य ठेवण्यात आल्या असून, राज्यभरातून व देशाच्या विविध भागांतून हजारो शिवभक्त उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. या ऐतिहासिक, दिव्य व भक्तिमय महाशिवयाग सोहळ्याला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सद्गुरू शंकर महाराज मठाच्या वतीने करण्यात आले आहे.

ग्रंथदिंडीच्या जल्लोषात 'कुसुमाग्रज वाचन अभियान'चा शुभारंभ

डोंगरगण शाळेत वाचन संस्कृतीची नवी पहाट

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगण येथे आज शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद अहिल्यानगर चे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भंडारी यांच्या प्रेरणेतून व शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनातून 'कुसुमाग्रज वाचन अभियानाची उत्साहपूर्ण सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या भव्य ग्रंथदिंडीने झाली. हातात विविध साहित्यिकांच्या ग्रंथांच्या प्रती, तसेच वाचनाचे महत्त्व सांगणारे सुविचारांचे फलक घेऊन विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढली. ''वाचाल तर वाचाल'', ''मोबाईल कमी, पुस्तक जास्त'' अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

ग्रंथदिंडीत विद्यार्थ्यांच्या हातात ययाती, विशाखा, नटसम्राट, शेतकऱ्याचे आसूड, फकिरा तसेच भारताच्या संविधानाची प्रतिकृती होती. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, कुसुमाग्रज आणि अण्णाभाऊ साठे यांच्या वेशभूषेत साकारलेली रूपे विशेष आकर्षण ठरली.

यानंतर शाळेत बाल वाचनालय उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य सर्जेराव मते, उपसरपंच संतोष पटारे, व्यवस्थापन समिती अध्यक्षा कोमल चांदणे, उपाध्यक्ष रवींद्र कदम, खेत्री मॅडम तसेच पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांनी मनोगतात सांगितले की, मोबाईलच्या वाढत्या आकर्षणामुळे कमी होत चाललेली वाचनाची सवय पुन्हा दृढ करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरेल. दररोज शाळेत ठराविक वेळी 'वाचन घंटा' वाजवून सर्व विद्यार्थी त्यांच्या वयानुरूप पुस्तकांचे पाठ्यपुस्तकांसह अवांतर वाचन करतील, अशी माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश्वर चेडे यांनी केले, तर आभार राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक नारायण मंगलारम यांनी मानले.

गळनिंब येथे एकलव्य जयंतीचे आयोजन

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : गुरुवर्य एकलव्य यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरातील आदिवासी समाजामध्ये उत्साहाचे वातावरण आहे.एकलव्य जयंतीनिमित्त प्रवरा परिसरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती दत्तात्रय माळी व कैलास माळी यांनी दिली.

तालुक्यातील गळनिब-उक्कलगाव परिसरात एकलव्याची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे.या जयंतीनिमित्त (दि.१७) फेब्रुवारी रोजी प्रतिमा पूजन, सांय.मिरवणूक त्यांनतर भव्य खिचडी महाप्रसादासह तसेच धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आदिवासी समाजाचे श्रद्धास्थान एकलव्य यांच्या प्रतिमा पुजनाने कार्यक्रमांची सुरूवात केली जाणार आहे.याप्रसंगी दुपारी चार वाजता एकलव्य समाज प्रबोधन या विषयावर आदिवासी बचाव समितीचे पदाधिकारी प्रमुख मान्यवर मार्गदर्शन करणार आहे.यात आदिवासी बचाव समितीचे संस्थापक शिवाजी गांगुर्डे,राष्ट्रीय श्रीराम संघाचे सागर बेग, एकलव्य सेनेचे ज्ञानेश्वर आहिरे,आदी प्रमुख मान्यवर कार्यक्रमस्थळी भेटी देणार आहे.याप्रसंगी सरपंच शिवाजी चिंधे,उपसरपंच दत्तात्रय माळी,हनुमंत चिंधे,आण्णासाहेब शिंदे,चांगदेव भागवत, संजय कुदनर, प्रा.एकनाथ ढोणे, बाळासाहेब वडितके,

दिलीप बर्डे,भैय्या गोसावी, साईनाथ बर्डे, मोहन गिरी,दिपक पवार, पैलवान गुलाबराव बर्डे, संजय गांगुर्डे, देविदास पवार, नवनाथ माळी, राधाकृष्ण बर्डे, अनिल माळी, सागर आहेर, गुलाब माळी, कचरू माळी, महेश माळी, महेश मोरे, सतोष माळी, बाळासाहेब माळी, सदिप शेरमाळे, उमाजी माळी, पप्पू माळी, गणेश माळी, गोकुळ माळी, संभाजी माळी, वंसत पवार, बापू आहेर, किशोर आहेर, लक्ष्मण माळी, रायभान वाघ, भाऊसाहेब माळी, आण्णू भोसले, संजय वडितके, मनोज विश्वासे, साहेबराव भोसले, बाळासाहेब भोसले,आण्णासाहेब मार्कंड, भगत भोसले, महेश भोसले, मनोज तुपे, मेहबूब आत्तार,आदी पदाधिकारी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

सोनोशी शाळेची जिल्हा अजिंक्य झेप; खो-खोमध्ये मुलींचे दैदिप्यमान यश

एकाच वर्षात चार पारितोषिके पटकावीत क्रीडा इतिहासात नवा अध्याय

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : मर्यादित सुविधा, साधी साधने आणि ग्रामीण पार्श्वभूमी पण जिद्द, नियोजन आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन यांच्या जोरावर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोनोशी हिने संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यासमोर क्रीडाक्षेत्रातील आदर्श निर्माण केला आहे. अहिल्यानगर जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत सोनोशी शाळेच्या मोठ्या गटातील मुलींच्या खो-खो संघाने जिल्हा अजिंक्यपद पटकावत पाथर्डी तालुक्याचा गौरव उंचावला आहे.

या स्पर्धेत पाथर्डी तालुक्याच्या संघांनी उल्लेखनीय कामगिरी नोंदवली. मुलांच्या मोठ्या गटातील संघाने पहिल्या फेरीत अटीतटीच्या लढतीत विजय मिळवत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. त्यानंतर पारनेर तालुक्यातील कोहकडी शाळेच्या बलाढ्य संघाशी झालेला सामना रंगतदार ठरला. निर्धारित वेळेत सामना ५-५ असा बरोबरीत सुटला. अतिरिक्त वेळेतही ४-४ अशीच स्थिती कायम राहिली. अखेर सडनडेथमध्ये कोहकडी संघाने बाजी मारली.

पराभव स्वीकारावा लागला असला तरी पाथर्डीच्या खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, शिस्त आणि खेळभावना उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरली.मुलांचा संघ उपांत्य फेरीत थांबला; मात्र मुलींच्या संघाने

जबाबदारी खांद्यावर घेत उपांत्य व अंतिम सामन्यात एकतर्फी विजय मिळवत जिल्हा अजिंक्यपद निश्चित केले. अचूक डावपेच, जलद चपळाई आणि एकजुटीच्या बळावर मिळवलेले हे यश संघभावना व सातत्यपूर्ण सरावाचे फलित असल्याचे स्पष्ट झाले.

विशेष म्हणजे, सोनोशी शाळेने यंदाच्या वर्षात तब्बल चार पारितोषिके पटकावत पाथर्डी तालुक्याच्या क्रीडा इतिहासात नवा अध्याय लिहिला आहे. लहान व मोठ्या गटातील मुलींच्या खो-खो संघांनी जिल्हा अजिंक्यपद मिळवले, तर लहान गट मुलांच्या खो-खो संघाने जिल्हास्तरीय तृतीय क्रमांक पटकावला. तसेच वैयक्तिक लांब उडी प्रकारातही तृतीय क्रमांक मिळवत विद्यार्थ्यांनी सर्वांगीण कामगिरीची नोंद केली.

या यशामागे शिक्षक अण्णासाहेब साळुंके, अमोल भंडारी तसेच मुख्याध्यापक देविदास बडे यांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि अथक परिश्रम मोलाचे ठरले. शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती, पालक आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्यामुळेच हा विजय शक्य झाला असल्याची भावना व्यक्त होत आहे.या ऐतिहासिक यशानंतर पाथर्डी तालुक्यातील शिक्षक बांधवांच्या वतीने सोनोशी शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षकांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड, विस्तार अधिकारी नीलेश शिरसागर तसेच पंचायत समिती पाथर्डीचे विषयतज्ज्ञ बाबासाहेब वामन उपस्थित होते. शिक्षकांची एकजूट, नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण परिश्रम यामुळेच हा गौरव तालुक्याला मिळाला आहे असे शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड म्हणाले.

या विजयामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, संघभावना आणि नेतृत्वगुण अधिक बळकट झाले असून त्यांच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळाली आहे असे विस्तार अधिकारी नीलेश शिरसागर यांनी सांगितले.

मोठी मैदाने, आलिशान सुविधा किंवा वर्षानुवर्षांचा सराव यशाची एकमेव गुरुकिल्ली नसते; जिद्द, मेहनत, योग्य नियोजन आणि विद्यार्थ्यांवरील विश्वास असेल, तर अशक्य वाटणारे ध्येयही गाठता येते, हे सोनोशी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. ग्रामीण भागातील या यशस्वी झेपेमुळे पाथर्डी तालुक्याच्या क्रीडा विश्वात नवचैतन्य संचारले असून, भविष्यातही अशीच उल्लेखनीय कामगिरी घडावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दैनिक
जनता आवाज
अहिल्यानगर, रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ पान नं. ८

साईबाबांच्या चरणी सोन्याचा हार

जनता आवाज वृत्तसेवा

शिर्डी : शिर्डीच्या श्री साईबाबांवर देश विदेशातील लाखो भक्तांची श्रद्धा आहे. याच श्रद्धेपोटी भाविक श्री साईबाबांच्या झोळीत भरभरून दान देत असतात. काल कोठारबन (जि. बीड, महाराष्ट्र) येथिल साईभक्त श्री धनराज रावसाहेब मुंडे यांनी श्री साईचरणी ५९ ग्रॅम वजनाचा आकर्षक नक्षीकाम असलेला सोन्याचा हार श्री साईबाबांच्या चरणी अर्पण करुन श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्याकडे सुपुर्द केला. या सुवर्ण हाराची किंमत ०८ लाख ४२ हजार ५२० रुपये असून हा सुंदर नक्षिकाम असलेला हार श्री साईबाबांच्या चरणी अर्पण केल्यानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी देणगीदार साईभक्तांचा सत्कार केला.

'गणेश'च्या कार्यक्षेत्रातून उसाची पळवा-पळवी

माजीमंत्री थोरात; परिसरातील शेतकऱ्यांनी 'गणेश'लाच ऊस द्यावा

जनता आवाज वृत्तसेवा

राहाता : श्री गणेश सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातून एक लाख मे. टनाहून अधिक उसाची विल्हेवाट झाली. हे गणेश परिसराच्या दृष्टीने योग्य नाही. गणेश चांगला चालला तर या परिसराची अर्थव्यवस्था चांगली राहील. या भागातील शेतकऱ्यांनी गणेशलाच ऊस द्यावा, गणेश कारखाना या परिसराचे हक्काचे साधन आहे, त्याला सभासद, शेतकरी यांनी जपावे, असे प्रतिपादन माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

श्री गणेश सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ या गळीत हंगामाची सांगता माजी मंत्री थोरात यांच्या अध्यक्षतेखाली व संजीवनीचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांच्या हस्ते झाली. त्याप्रसंगी थोरात बोलत होते. याप्रसंगी गणेश कारखान्याचे चेअरमन सुधीर लहारे, व्हा. चेअरमन विजय दंडवते, माजी चेअरमन ॲड. नारायणराव कार्ले, साईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त डॉ. एकनाथ गोंदकर, शिवाजीराव लहारे, कार्यकारी संचालक जी. बी. शिंदे, संगमनेरचे कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, संजीवनीचे जनरल मॅनेजर दिवटे, ॲड. पंकज लोंढे, धनंजय गाडेकर, नगरसेवक शशिकांत लोळगे, विक्रांत दंडवते यांच्यासह गणेश कारखान्याचे संचालक मंडळ उपस्थित होते.

थोरात पुढे म्हणाले, गणेश कारखानाच्या वाटचालीत संकट आणि अडथळ्याची मालिका सुरू आहे. रोज वाटेत काटे टाकण्याचे काम चालूच आहे, साडेतीन लाख टनऊस गाळपास होता. उसाची पळवा- पळवी झाली. गणेश या परिसराची कामधेनू आहे. अशाने या परिसराची अर्थव्यवस्था खिळखिळी होईल. वास्तविक गणेश चांगला चालण्यासाठी या भागातील सभासद शेतकरी यांनी आपला ऊस गणेशलाच दिला पाहिजे. खरे तर कोल्हे व आम्ही गणेशला समर्थ करण्याचेच काम करत आहोत. कारखाना पुढे कसा जाईल, याचाच विचार आम्ही करतो.

१ लाख ६० हजार मे. टन उसाची विल्हेवाट

संजीवनीचे चेअरमन विवेक कोल्हे म्हणाले, गणेश कारखान्याचे या गाळाप हंगामात साडेतीन लाख मॅट्रिक टन ऊस गाळपाची उद्दिष्ट होते. परंतु उसाची कार्यक्षेत्रातून होणारी विल्हेवाट, तसेच कारखान्यातील तांत्रिक अडचणी यामुळे कारखाना ९० दिवस चालला. आणि त्यातून दोन लाख मेट्रिक टन ऊस गाळप करू शकला. गणेशच्या कार्यक्षेत्रातून विखे कारखान्याने ८० हजार टन, कोळपेवाडी कारखान्याने ४०००० टन ऊस नेला. तसेच इतर कारखान्याने ३५ हजार टन ही ऊस नेला अशी दीड ते १ लाख ६० हजार मेट्रिक टन उसाची विल्हेवाट झाली.

गणेश कारखान्याचे चेअरमन सुधीर लहारे म्हणाले, संगमनेर व संजीवनी या दोन्ही कारखान्यांचे या गाळप हंगामासाठी सहकार्य मिळाले. टरबाइन चा खोळंबा झालेला असतानाही कारखान्याने दोन्ही नेत्यांच्या सहकार्याने दोन लाख मेट्रिक टन गाळप केले. पुढील हंगामात विल्हेवाट झालेला ऊस पुन्हा गणेश कारखान्याला येईल, असा विश्वास चेअरमन लहारे यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कारखान्याचे सेक्रेटरी नितीन भोसले यांनी केले. तर आभार संचालक आलेश कापसे यांनी मानले. याप्रसंगी कारखान्याचे संचालक मंडळ उपस्थित होते.

युवक संघ क्रिडा अध्यक्षपदी भाऊसाहेब गव्हाणे

जनता आवाज वृत्तसेवा

टाकळीभान : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील भाऊसाहेब शंकर गव्हाणे यांची अ. भा. गोपाळ श्रीकृष्ण उत्कर्ष युवक संघ क्रिडा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडी संदर्भातील पत्र त्यांना नूकतेच मिळाले आहे. राष्ट्रहित व समाजहित जोपासून, युवकांमध्ये एकी, शिस्त, संघटन व सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करण्यासाठी व गोपाळ समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असणाऱ्या अ. भा. गोपाळ समाज उत्कर्ष संघाकडून भाऊसाहेब गव्हाणे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल गव्हाणे यांचा शेतकरी संघटना व टाकळीभान ग्रामस्थांच्या वतीने नूकताच सन्मान करण्यात आला.

या निवडीबद्दल शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजित काळे यांच्या हस्ते व टाकळीभान ग्रामस्थांच्या वतीने गव्हाणे यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकरी संघटनेचे प्रवक्ते कार्लस साठे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, उपसरपंच बंडूपंत चौगुले, प्रा. जयकर मगर, खंडेराव सरोदे, अनिल बोडखे, बापूसाहेब शिंदे, गजानन कोकणे, सुजित बोडखे, काकासाहेब डिके, मधूकर गायकवाड, मच्छिंद्र कोकणे, औटी, विष्णूपंत पटारे, आदींसह क्रीडाप्रेमी व ग्रामस्थांनी गव्हाणे यांचे अभिनंदन केले आहे.

निळवंडे कालव्याचे पाणी शेतकऱ्यांच्या बांधावर

वेस-सोयगाव, काकडीच्या शेतकऱ्यांनी मानले आ. काळेंचे आभार

जनता आवाज वृत्तसेवा

कोळपेवाडी : कोपरगाव मतदारसंघाच्या जिरायती गावाला वरदान ठरणाऱ्या निळवंडे कालव्याचे पाणी आ. आशुतोष काळे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यातून जिरायती भागात ओढ्याच्या माध्यमातून पोहोचले आहे. परंतु बुधवार (दि.११) रोजी प्रमुख वितरीकाद्वारे हे पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचले असून त्यामुळे आनंदी झालेल्या वेस-सोयगाव, काकडीच्या शेतकऱ्यांनी कर्मवीर शंकरराव काळे कारखाना कार्यस्थळावर आमदार आशुतोष काळे यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले आहे.

जिरायती ११ गावांना मागील कित्येक दशकांपासून निळवंडेच्या पाण्याची प्रतीक्षा होती. निळवंडे कालव्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर हे पाणी या ११ गावात आणण्यासाठी जुने ओढे-नाले उकरून तर काही ठिकाणी डोंगळे टाकून हे पाणी जिरायती गावात आमदार आशुतोष काळे यांनी पोहोचवून गावतळे, बंधारे, साठवण तलाव भरून देवून नागरीकांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम चा सोडविला आहे. त्यामुळे ज्या जिरायती गावांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून रहावे लागत होते त्या गावांना आता टँकरची गरज राहिली नाही. तरी देखील राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पा. व आमदार आशुतोष काळे याच्या उपस्थितीत वितरीकांच्या कामांचे भूमिपूजन झाल्यापासून वितरीकांची कामे तातडीने कसे पूर्ण होतील व शेतकऱ्यांच्या शेतात वितरिकाद्वारे लवकरात लवकर कसे पाणी पोहोचवता येईल आणि हा जिरायती परिसर कसा सुजलाम सुफलाम करता येईल यासाठी ते बारीक लक्ष ठेवून होते.

याप्रसंगी चंद्रकांत पाडेकर, सिकंदर इनामदार, सतीश म्हाळसकर, गिताराम पाचोरे, कारभारी पाचोरे, नजीर इनामदार, सुधाकर म्हाळसकर, जालिंदर कोल्हे, सोमनाथ कोल्हे, दत्तात्रय म्हाळसकर, सोपानराव म्हाळसकर, शिवाजीराव पाडेकर, बाबासाहेब गायकवाड, साईनाथ कोल्हे आदींसह शेतकरी उपस्थित होते.

रुग्णवाहिकेसह मृतदेह थेट पोलीस ठाण्यात

अप्पर पोलीस अधीक्षकांच्या निर्णयानंतर मृतदेहावर अंत्यसंस्कार

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : संगमनेर तालुक्यातील संगमनेर खुर्द येथील वैदुवाडी परिसरात राहणाऱ्या सुरज शिंदे यांच्या मृत्यूवरून शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. हा अपघात नसून खून असल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त करत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. सुरज शिंदे यांचे शवविच्छेदन नाशिक जिल्हा रुग्णालय येथे करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी नाशिक येथून मृतदेह रुग्णवाहिकेतून थेट संगमनेर शहर पोलीस ठाणे येथे आणण्यात आला.

जोपर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत मृतदेह हलवणार नाही, असा ठाम निर्णय नातेवाईकांनी घेतला होता. पोलिसांनी वेळीच गुन्हा दाखल केला नाही तर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. मृतदेह रुग्णवाहिकेसह पोलीस ठाण्यात आणल्याने वातावरण चांगलेच तापले होते. श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, यांनी तातडीने संगमनेर येथे धाव घेतली. त्यांनी नातेवाईकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, गुन्हा दाखल झाल्याशिवाय मृतदेह हलवणार नाही, या भूमिकेवर नातेवाईक ठाम होते. त्यानंतर आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांनीही शहर पोलीस ठाण्यामध्ये येऊन नातेवाईकांची समजूत काढली. तब्बल १५ तासांनंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेऊन अंत्यविधीसाठी नेला. दुपारी संगमनेर खुर्द येथील अमरधाम येथे शोकाकुल वातावरणा मध्ये सुरज शिंदे याच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

संगमनेर खुर्द येथील वैदू समाज बांधवांनी आमदार अमोल खताळ यांची शासकीय विश्रामगृहवर भेट घेऊन हा मृत्यू अपघाती नसून घातपात असल्याचा संशय व्यक्त केला. त्यानंतर आ. खताळ यांनी पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्याकडून माहिती घेतली असता घटनामध्यरात्री घडली आहे. त्यामुळे अपघाताची नोंद केली आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच या मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे, असे पोलीस प्रशासनाने सांगितले आहे.

'साई संस्थान एम्प्लॉईज'कडून पाणी वाटप

जनता आवाज वृत्तसेवा

शिर्डी : श्री साईबाबांवर श्रद्धा ठेवून शिर्डीमध्ये साईभक्तांच्या उपस्थितीत 'श्री साई परिक्रमा' महोत्सव नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांनी 'साईराम'च्या जयघोषात परिक्रमा पूर्ण केली.

या भक्तीमय वातावरणात भाविकांच्या सेवेसाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, शिर्डी यांच्या वतीने उल्लेखनीय सेवा उपक्रम राबविण्यात आला. परिक्रमेत सहभागी झालेल्या भाविकांसाठी मोफत थंड पेय व पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले. उन्हाच्या झळा आणि चालण्यामुळे थकलेल्या भाविकांना या सेवेमुळे मोठा दिलासा मिळाला. हजारो भाविकांनी या सेवेचा लाभ घेत समाधान व्यक्त केले.

या सेवा उपक्रमाप्रसंगी सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार, व्हाईस चेअरमन पोपटराव कोते तसेच संचालक मंडळातील सर्व सदस्य आवर्जून उपस्थित होते. त्यांनी स्वतः उपस्थित राहून व्यवस्थेची पाहणी केली आणि भाविकांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना चेअरमन विठ्ठल पवार म्हणाले, साईभक्तांची सेवा करण्याचे भाग्य मला लाभले, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी समाधानाची गोष्ट आहे.

चेअरमन विठ्ठल पवार यांनी सांगितले की, साई परिक्रमा हे वर्षातील ३६५ दिवस सुरू असणारे अखंड व्रत आहे. तीन सहा पाच यांची बेरीज १४ होते. १४ किलोमीटरची ही परिक्रमा आहे. या पार्श्वभूमीवर सोसायटीच्या प्रत्येक 'साई प्रसाद' स्टॉलवर साई परिक्रमेचे विशेष स्टिकर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. हे स्टिकर साईभक्तांना वर्षभर मोफत दिले जाणार आहेत.

मातृ-पितृ पूजन दिवस साजरा

जनता आवाज वृत्तसेवा

सोनई : आई-वडिलांबद्दल आदर, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी किडस किंगडम अकॅडमी शाळे मध्ये 'मातृ पितृ पूजन' दिवस मोठ्या उत्सहाहात साजरा करण्यात आला. मुलांनी आपल्या पालकांना तिलक लावून, फुले अर्पण करून पूजन केले.

मुलांना आपल्या संस्कृतीची ओळख करून देणे, आई-वडिलांचा सन्मान करणे आणि पाश्चात्य संस्कृतीपासून दूर ठेवणे या उद्देशाने आज हा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रम योग वेदांत सेवा समितीचे सदस्य संदीप चोथे, शिवाजी शेळके, सुनील कुसळकर, सुरेश लष्करे, पिराजी कुसळकर, संजय गर्जे, अरुण घावटे, कृष्णा सुद्रिक व शाळेच्या मुख्याध्यापिका कीर्ती बंग यांच्या उपस्थितिमध्ये आनंदात पार पडला.

मनशांतीसाठी शिव उपासना करावी : शर्मा महाराज

जनता आवाज वृत्तसेवा

पुणतांबा : आजच्या धावपळीच्या युगात मानव मनशांती हरवला असून मानवाच्या मनशांतीसाठी व स्वतःच्या प्रगतीसाठी आज शिव उपासना करणे गरजेचे आहे. शिव उपासना ही सर्वोत्तम उपासना असून याची अनुभूती सर्वांनी घ्यावी, असे आव्हान मध्य प्रदेश येथील आचार्य दीपक महाराज शर्मा यांनी भाविकांना केले

पुणतांबा येथे गेल्या रविवारपासून शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले असून आचार्य दीपक महाराज शर्मा यांच्या सु श्राव्यवाणीतून शिव महापुराण कथेला अलोट गर्दी होत आहे. भगवान शिव नामाच्या जयकाराने पुणतांबा परिसर मंत्रमुग्ध झाला आहे. आजच्या जगात मानव आपली मनशांती हरवला असून जीवनातील ताण- तणाव मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. हा तणाव कमी करण्यासाठी व स्वतःची आध्यात्मिक सर्वांगीण प्रगती करण्यासाठी जीवनामध्ये गुरुचे स्थान महत्त्वाचे असून भगवान शिवाला गुरु

केल्यास त्यांची सेवा केल्यास सर्वांना अनुभव येत आहे.'एक लोटा जल सारी समस्या का हाल' याप्रमाणे सर्वांनी सेवा जर मनोभावे केली तर शंभर टक्के परमेश्वर आपल्यावर प्रसन्न होतात. गेल्या चार-पाच दिवसांपासून शिवमहा पुराण कथेला अलोट गर्दी होत असून कथा संपल्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येत असून दानशूर व्यक्ती यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात येत आहे. आज महाशिवरात्रीच्या दिवशी भाविकांना रुद्राक्षाचे वाटप करण्यात येणार असून रुद्राक्ष महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

काष्टीतील आम्रपाली लॉजवर पोलिसांचा छापा

सात महिलांची सुटका; २२,५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीगोंदा : तालुक्यातील काष्टी येथील आम्रपाली लॉज अँड बार येथे महिलांना डांबून ठेवून जबरदस्तीने देहव्यवसाय करवून घेतला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर अहिल्यानगर पोलीस पथक आणि श्रीगोंदे पोलीस स्टेशन यांनी १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी छापा टाकत सात महिलांची सुटका केली. कारवाई दरम्यान रोख रकमेसह २२,५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मानवी तस्करी नियंत्रण पथकाचे पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांना दुपारी गोपनीय माहिती मिळाल्यानंतर दोन पंचांना बोलावून पंचनामा करण्यात आला. त्यानंतर महिला कर्मचारी, पंच आणि डमी ग्राहक यांच्या मदतीने सायंकाळी कारवाईचे नियोजन करण्यात आले. डमी ग्राहकाला दोन ५०० रुपयांच्या नोटा देऊन हॉटेलमध्ये पाठवण्यात आले. डमी ग्राहकाकडून इशारा मिळताच पोलिसांनी तिसऱ्या मजल्यावर धाड टाकली. काउंटरवर बसलेल्या व्यक्तीने आपले नाव रणजित राम पुजारी (रा. कर्नाटक) असे सांगितले. डमी ग्राहकाने दिलेल्या नोटा त्याच्याकडे आढळल्या. यावेळी मकेशकुमार यादव व नागनाथ इंगळे हेही तेथे काम काजात मदत करताना आढळले. पंचांसमक्ष पाच खोल्यांची झडती घेतली असता एका खोलीत ग्राहकासह महिला, दुसऱ्या खोलीत डमी ग्राहकासह महिला, तर इतर ठिकाणी मिळून एकूण सात महिलांना ठेवण्यात आल्याचे दिसून आले. चौकशीत पीडित महिलांनी पैशांचे आमिष दाखवून देहव्यवसाय करवून घेत असल्याचे सांगितले. या कारवाईत तीन आरोपी व एक ग्राहक अशा चौघांना ताब्यात घेण्यात आले. रोख रक्कम, मोबाईल व इतर साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपास प्रभारी पोलीस निरीक्षक पिसाळ करत असून अनैतिक मानवी वाहतूक व देहव्यवसाय प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मालक व चालकावर गुन्हा दाखल करा

काष्टी येथील आम्रपाली हॉटेलवर देहविक्री बाबत पोलिसांनी कारवाई करून पिटा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र हॉटेल मालक व चालक यांच्यावर गुन्हा दाखल न करता काउंटरवर बसणारा मुलगा व त्यास मदत करणारा वेटर यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात आम्रपाली हॉटेल मालक व चालकावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी होत आहे.

बांधकाम कामगारांनी एजंटांना बळी पडू नये

आ. खताळ; दोन हजार बांधकाम कामगारांना भांडी वाटप

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : संगमनेर तालुक्यात महायुती सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा बांधकाम कामगारांना लाभ देण्यात येत आहे. ही सर्व प्रक्रिया विनामूल्य राबविण्यात येत असून बांधकाम कामगारांनी कोणत्याही एजंटांना पैसे न देता थेट महायुती जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क साधून अर्ज भरून लाभ घ्यावा, असे आवाहन संगमनेरचे आ. अमोल खताळ पाटील यांनी केले.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वाटप करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आ. खताळ पुढे म्हणाले की, केंद्र आणि राज्यात महायुतीचे सरकार असून संगमनेरात शिवसेनेचा आमदार असल्यामुळे विकासकामांमध्ये कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, असे सांगत आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये महायुती सरकारच्या पाठीशी भक्कम उभे राहण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. दोन हजार बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच देण्यात आले. तसेच यापुर्वी एकूण तेरा हजार बांधकाम कामगारांना बांधकाम कामगार कल्याणकारी योजनेअंतर्गत संगमनेर तालुक्यातील ६१४४लाभाचे प्रस्ताव अर्ज मंजूर करून ६ कोटी ३५ लाख ४ हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात आले असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

कार्यक्रमाला व्यासपीठावर बांधकाम अधिकारी सौरभ हामंद, उदय सूर्यवंशी, प्रकाश भोसलेशेतकरी नेते संतोष रोहम, ज्येष्ठ नेते वसंतराव देशमुख, शिवसेनेचे जिल्हा संघटक विठ्ठलराव घोरपडे, तालुका प्रमुख रामभाऊ राहाणे, राजेंद्र सोनवणे, शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी भाजप तालुका अध्यक्ष गुलाब भोसले उपस्थित होते.

६१४४ लाभार्थ्यांना अर्थसहाय्य

शैक्षणिक योजनेतून ५८४१ लाभार्थ्यांना ५ कोटी ७२ लाख २७ हजार रुपये, आरोग्य योजनेत १९ लाभार्थींना ६ लाख ७२ हजार रुपये, सामाजिक योजनेत १२४ प्रकरणांमध्ये २९ लाख २५ हजार रुपये अर्थसहाय्य योजनेत ६० लाभार्थींना ३० लाख ३२ हजार रुपयांचा लाभ देण्यात आला.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ RNI No. MAHMAR/2022/85155. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028, RNI No. MAHMAR/2022/85155.